पुण्यश्लोक अहिल्याबाई

अशोक बेंडखळे

आभार

पुण्यश्लोक अहिल्याबाई

या पुस्तकाचे सर्व हक्क **लेखक श्री. अशोक बेंडखळे** यांचेकडे आहेत.

"पुण्यश्लोक अहिल्याबाई" या चरित्राची ही ई आवृत्ती आहे. ई साहित्यावर विनामूल्य करण्यात आली आहे. छापिल प्रत लेखकांकडून विकत मिळू शकेल.

हे पुस्तक ई साहित्यवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही श्री. अशोक बेंडखळे यांचे मनःपुर्वक आभार मानतो. या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाची परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान- ग्रंथाली, मुंबई यांचे मनःपूर्वक आभार मानते.

वाचकांनी वाचून झाल्यावर हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचवावे (Forward and viral) अशी विनंती आम्ही सर्व वाचकांना करतो.

पुस्तकावरील आपले अभिप्राय

श्री. अशोक बेंडखळे यांना **9869258585**

या क्रमांकावर कळवावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी नाव आणि गाव

Whatsapp करा

User2:\E:\Aniruddha\2022 Books\Ashok Bendakhale\Ahilyabai Holkar\First Pages.pmd

पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर

अशोक बेंडखळे

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ११८०

ISBN No. 978-93-5795-00 ????

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
अशोक बेंडखळे

पहिली आवृत्ती : २५ नोव्हेंबर २०२२

© अशोक बेंडखळे
२/३०९ 'डी', विमान दर्शन, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५
ashok.bendkhale@gmail.com

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks@gmail.com

मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे : प्रमोद जोशी

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

मूल्य १०० रुपये

छोटा नातू अर्जुन यास–

दुबईत राहून मराठी शिकण्याची तुझी धडपड कौतुकास्पद

मनोगत

छोट्या मुलांसाठी इतिहासातील पराक्रमी स्त्रियांची चरित्रे लिहायची हे माझ्या मनात खूप वर्षांपासून होते. सहा वर्षांपूर्वी राजा प्रकाशनाचे मुळे यांनी सुचवल्याप्रमाणे आधुनिक काळातील पाच स्त्रियांची चरित्रे लिहिली आणि 'महाराष्ट्राच्या पंचकन्या' या मालिकेअंतर्गत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई कर्वे या छोटेखानी पुस्तकांची निर्मिती झाली. डोक्यातला मूळ विचार गेला नव्हता. त्यातून राणी लक्ष्मीबाईंचे छोटे चरित्र लिहिले आणि 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांना भेटलो. ते तात्काळ म्हणाले, ''एक पुस्तक का? पाच पुस्तके करूया.'' अशाप्रकारे 'ऐतिहासिक पंचकन्या' अंतर्गत राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई अशी पाच पुस्तके तयार झाली.

अहिल्याबाई होळकर यांनी केलेला राज्यकारभार आदर्श होता. इ.स. १७६७ ते १७९५ अशी अठ्ठावीस वर्षे इंदूरच्या संस्थानाचा उत्तम कारभार करून प्रजेचा विश्वास प्राप्त केला. प्रजेच्या सुखासाठी, आनंदासाठी काय करायचं हे त्यांच्या प्रदीर्घ यशस्वी कारकीर्दीचं धोरण, ध्येय आणि सूत्र राहिलं होतं. प्रजेसाठी केलेल्या अनेक लोकोपयोगी कामांमुळे आणि दानधर्म करण्याच्या वृत्तीमुळे त्यांना पुण्यश्लोक ही मानाची पदवी लोकांकडून मिळाली. त्यांच्या कारकीर्दीविषयी तत्कालीन भारताचा गव्हर्नर माल्कम साहेबांनी गौरवोद्‌गार काढले आहेत हे विशेष.

अहिल्याबाईंचे हे छोटे चरित्र प्रसिद्ध होताना खूप आनंद होतो आहे. चित्रकार प्रमोद जोशी यांनी प्रसंगानुसार सुंदर रेखाचित्रे काढली आहेत, मुखपृष्ठही मोहक रेखाटले आहे. त्यांचे तसेच पुस्तक देखण्या रूपात प्रसिद्ध केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांचे मनःपूर्वक आभार!

■ **अशोक बेंडखळे**

अनुक्रम

१. अहिल्याबाईचं लग्न आणि नंतर / १

२. मल्हाररावांकडून कारभाराचे धडे / ७

३. पती खंडेरावाचा मृत्यू / १०

४. राज्यकारभाराला प्रारंभ / १५

५. संस्थानाबाहेरील राजकारण / २५

६. अंतर्गत राज्यव्यवहार / २९

७. राज्यात केलेल्या सुधारणा / ३५

८. अहिल्याबाईंची लोकोत्तर कामे / ४३

९. आप्तांच्या मृत्यूमालिका व शेवट / ४८

१. अहिल्याबाईचं लग्न आणि नंतर

मराठेशाहीतल्या उत्तर पेशवाईच्या काळामधील एक तेजस्वी, साध्वी स्त्री म्हणजे अहिल्याबाई होळकर. अहिल्याबाई उत्तम राज्यकारभार आणि दातृत्व या गुणांवर संपूर्ण भारत देशात ख्यात झाली. भारतभर तिने रस्ते, मंदिरे, धर्मशाळा, नद्यांवर घाट पाणपोया अन्नछत्रे इत्यादी सुविधा सामान्य जनांसाठी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे तिला लोकांनी 'पुण्यश्लोक' या सन्मान्य पदवीने गौरविले. तिचे चरित्र-जीवन सर्वांना मार्गदर्शक आणि स्फूर्तीदायक ठरेल असे आहे.

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील चौंडी या गावी ३१ मे १७२५ या दिवशी अहिल्याबाईचा जन्म झाला. तिच्या वडिलांचं नाव माणकोजी शिंदे तर आईचं नाव होतं सुशीला. माणकोजी गावचे पाटील होते आणि धनगर समाजासाठी हा बहुमान मानला जायचा. त्यांचे कुलदैवत खंडोबा म्हणजेच मल्हारी मार्तंड हे होते. अहिल्याबाईचे वडील माणकोजी चांगले धर्मपरायण आणि सात्विक वृत्तीचे होते. माणकोजी यांना अहिल्याशिवाय पाच मुलगे होते. त्यापैकी शहाजी व महादजी शिंदे हीच नावे सर्वांना माहीत आहेत. त्याकाळी स्त्रियांना

शिक्षण देण्याची समाजात प्रथा नव्हती तरी घरच्या चांगल्या संस्कारांमुळे अहिल्याबाई लिहायला व वाचायला शिकली. लहानपणापासून तिला धार्मिक ग्रंथ व पोथ्यापुराण वाचण्याचा छंद जडला होता. रूढार्थानं अहिल्याबाईचं शिक्षण झालेलं नसलं तरी पोथ्यापुराणं यांच्या वाचनानं ती चांगली बहुश्रुत झाली होती आणि तिच्या अंगी धार्मिक वृत्ती आली होती.

त्या काळच्या प्रथेप्रमाणे मुलामुलींची लग्ने बालपणीच वयाच्या आठव्या वा दहाव्या वर्षी होत. त्याप्रमाणे अहिल्याबाईचं लग्न इ.स. १७३३ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी सरदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव याच्याबरोबर झालं.

अहिल्याबाईचा विवाह खंडेरावाशी होण्यापूर्वीच मल्हारराव होळकर हे पेशव्यांचे नामांकित सरदार म्हणून नावारुपास आले होते. इंदूर संस्थानचे संस्थापक मल्हारराव होळकर यांचा भाग्योदय इ.स. १७२५ पासून सुरू झाला होता. त्यावर्षी मल्हाररावाच्या सरंजामी सरदारीचा सन्मान लाभला. पुढे इ. स. १७२८ मध्ये त्यांना नर्मदेच्या

उत्तरेस खानदेशात बारा परगणे मिळाले आणि ही संख्या चार वर्षाच्या आत चौऱ्याऐंशीपर्यंत गेली. शेवटी पेशव्यांनी माळवा प्रांत जिंकून त्यावर आपलं प्रभुत्व स्थापन केलं. पेशव्यांनी एक कर्तबगार सरदार म्हणून मल्हाररावांस त्या प्रांताचा अधिकारी केले. या घटनेने होळकर घराण्याला अकल्पित अशी प्रतिष्ठा प्राप्त झाली. आपल्या मामाच्या घरी मेंढरांची देखभाल करणाऱ्या मल्हाररावांना आपल्या अंगी असलेल्या गुण व शौर्य या बळावर एका प्रांताचे प्रमुखपद लाभले.

मल्हारराव होळकरांची पट्टराणी होती गौतमाबाई. त्या मोठ्या करारी आणि पतिनिष्ट अशा स्त्री होत्या. खूप प्रेमळ अशा या जोडप्याला इ. स. १७२३च्या दसऱ्याच्या शुभ दिवशी पुत्ररत्न प्राप्त झाले. खंडोबा हे होळकर घराण्याचे आराध्य दैवत. आणि त्यामुळे मल्हारराव व गौतमाबाई यांनी आपल्या पुत्राचे नाव खंडेराय असे ठेवले. खंडेराव नऊ-दहा वर्षाचा होताच त्याच्या आई-वडीलांना सूनसुख पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली. मल्हारी होळकर आता साधासुधा धनगर राहिला नव्हता. रणांगणावर मर्दुमकी गाजवून त्याला सरदारीचा सन्मान मिळाला होता. एका प्रांताचे प्रमुखपद लाभले होते. पदरी धनदौलत अमाप साठली होती. आपल्या रुबाबास शोभून दिसेल अशा कुळातील मुलगी खंडेरावास बायको म्हणून मिळावी ही इच्छा असणे हे योग्य होते. पण त्याकाळी अशा तालेराव कुटुंबाला सोयरिक करण्याजोगे धनगर कुळात राजे नव्हते, सरदार नव्हते. धनगरांमध्ये श्रेष्ठ कुटुंबे असत ती पाटलांची. खंडेरावासाठी एखाद्या पाटलाची मुलगी पाहणं हा एवढा एकच पर्याय उरला. आणि मग एखादं चांगलं पाटलाचं कुटुंब पाहण्याचा शोध मल्हाररावांनी सुरू केला. त्यात त्यांना चौंढ्याच्या माणकोजी पाटलांची मुलगी अहिल्या आपल्या मुलासाठी योग्य वाटली. अहिल्याचे रुप एवढे नजरेत भरणारे नव्हते पण माणकोजी व शिंदे यांचे मूळ घराणे लौकिकाचे व मातब्बर होते. त्यामुळे या

लग्नाचा योग जुळून आला. अशा प्रकारे इ. स. १७३३ मध्ये खंडेराव होळकर आणि अहिल्याबाई शिंदे यांचा विवाह होळकरांच्या वैभवास साजेशा रीतीने खूप थाटामाटात पार पडला. विवाहाच्यावेळी वधूचे वय होते आठ वर्ष तर वर होता दहा वर्षाचा. शिंदे घरातील अहिल्याबाई आता होळकर कुटुंबातील अहिल्याबाई होळकर झाली आणि मल्हारराव होळकरांची सून म्हणून इंदूरच्या होळकर वाड्यात आली.

खंडेराव हा मल्हारराव होळकरांचा एकुलता एक पुत्र होता. त्यामुळे तो खूप लाडात मोठा झाला होता. त्याला शिकारीचा नाद होता आणि मित्रांमुळे भांग पिण्याचे व्यसन जडले होते. खंडेराव शूर, साहसी पण स्वभावाने उद्दाम होता. लहानपणापासून तो आपल्या वडिलांबरोबर लढाईवर जाऊ लागला होता त्यामुळे युद्ध कलेचे प्रत्यक्ष शिक्षण त्याला रणांगणांवर मिळाले. १७३५ सालच्या मार्चमध्ये थोरले बाजीराव उत्तरेच्या मोहिमेवर निघाले. सुभेदार मल्हारराव होळकर आणि सुभेदार राणोजी शिंदे त्यांना साथ करीत होते. तेव्हा त्याचा सैन्यात इतर सरदारांच्या बरोबर खंडेराव होता.

१५ ऑगस्ट १७३५ रोजी खंडेरावास कोरेगाव व उडवंडी या गावाची जहागीर, मोकासा, सरदेशमुखी इ. अधिकार देण्यात आले. त्याच्या शौर्याचा गौरव म्हणून त्याला शिलेदार म्हणून मान्यता मिळाली. शिलेदारी मिळताच खंडेराव आपल्या पित्याच्या सैन्यात हक्काने सामील झाला. मल्हाररावांच्या आदेशावरून खंडेराव स्वतंत्रपणे काही मोहीमा चालवत असे. आक्टोबर १७४६ मध्ये जयपूरच्या वारसायुद्धात भाग घेण्याची मल्हाररावांची आज्ञा त्याने पाळली. सवाई जयसिंगच्या निधनानंतर त्याचे दोन पुत्र ईश्वरसिंग व माधोसिंग यांच्या वारसा हक्काच्या भांडणात खंडेरावाने माधोसिंगला मदत केली.

खंडेरावाला वडील मल्हाररावांकडून उत्तम शिक्षण लाभूनही कुटुंबाला तो तापदायक झालेला होता. आणि त्याचे कारण त्याच्या अंगचे एकेक दुर्गुण. खंडेराव व्यसनी, तापट, स्वच्छंदी आणि उधळ्या होता पुष्कळवेळा तो घुटीच्या, भांगेच्या व दारुच्या नशेत असायचा. अहिल्याबाईला लग्नाच्या काही दिवसातच आपल्या दुर्वर्तनी नवऱ्याची कल्पना येऊन चुकली होती. अहिल्याबाईला योग्यतेप्रमाणे नवरा लाभला नाही, तरी सासू गौतमाबाई तिच्यावर लेकीप्रमाणे प्रेम करीत. तिचीही सासूवर खूप माया होती. वयाच्या मानाने अहिल्येला समज खूप असल्याने मल्हाररावानांही सूनेचं खूप कौतुक वाटत असे. तीही आपल्या सासू-सासऱ्यांचा मान ठेवी. त्या कुटुंबात एकुलता एक पुत्र खंडेराव हाच एक मुलुखावेगळा होता. असे असले तरी अहिल्याबाई नवऱ्याशी गोडी, गुलाबीने वागे. त्याच्याबद्दल तिने कधी अनादर दाखवला नाही. सासू-सासऱ्यांची आपल्या सूनेवर खूप माया होती त्यामुळे तिला संसारात पतीसुख लाभले नाही तरी ती खूष होती. तिच्याठायी असलेल्या अनेक गुणांमुळे तिने सासू-सासऱ्यांचे मन जिंकले होते. मल्हाररावांना आपल्या पोटच्या दुर्वर्तनी मुलाकडून जास्त काही अपेक्षा नव्हत्या. त्यामुळे ते आपल्या सूनेला आपला मुलगा मानू लागले. खंडेरावास दौलतीच्या

कामात रस नव्हता तसेच कारभार हुशारीने रेटण्याची बुद्धिमत्ता व कुवतही त्याच्यात नव्हती. या सगळ्या गोष्टी मल्हाररावांच्या लक्षात आल्यावर त्यांनी अहिल्येला आपल्या तालमीत तयार करण्याचा मनसुबा मनाशी केला.

■

२. मल्हाररावांकडून कारभाराचे धडे

खंडेराव होळकर लहानपणापासून वडील मल्हाररावांच्या बरोबर लढाईवर जाऊ लागला होता. युद्धकलेचे शिक्षण त्याला प्रत्यक्ष रणांगणांवर मिळू लागले. युद्धभूमीवर पराक्रम गाजवत असतानाच त्याचे तरुण मन हळूहळू तारुण्य सुलभ मोहाच्या आहारी गेले. नावाजलेल्या सरदाराचा तरुण मुलगा त्यामुळे अनेक स्वार्थापायी बरेच सवंगडी त्याच्याभोवती जमा होऊ लागले होते आणि त्यातून त्याला अनेक वाईट व्यसनांची लागण झाली. भांग पिण्यात तो अग्रेसर असे. चारित्र्यातही तो फारसा सोवळा नव्हता. लग्न होऊन सासरी आल्यावर कुशाग्र बुद्धीच्या अहिल्येच्या ध्यानात नवऱ्याचे हे सगळे अवगुण आणि स्वच्छंदी वर्तन ध्यानात आले. पण नाऊमेद न होता ती घरातील कामामध्ये अधिक लक्ष देऊ लागली कोणतेही काम तिच्या अंगावर सोपवले तर ती ते मोठ्या हुषारीने आणि तत्परतेने पूर्ण करीत होती. सासरे मल्हाररावांच्या कर्तृत्वामुळे अमाप संपत्ती घरी येत होती. त्या संपत्तीचा हिशोब ठेवणे ती समजून करू लागली होती. लवकरच मल्हारराव होळकरांच्या खजिन्याच्या किल्ल्या अहिल्याबाईच्या हातात पडल्या. मल्हारराव होळकर लढाईत अगणित द्रव्य मिळवून आणीत

होते आणि संस्थानच्या उत्पन्नात या द्रव्याची सतत भर पडत होती. अहिल्याबाई या सर्व द्रव्याची काळजीपूर्वक नोंद करू लागली होती. तसेच त्याची योग्य तजवीज करू लागली होती. अहिल्याबाईच्या या गुणांमुळे आणि मुलाचे वर्तन व अवगुण आवडत नसल्यामुळे मल्हाररावांचा ओढा आपली सूनबाई अहिल्याकडे अधिक होऊ लागला होता यात नवल नव्हते.

अहिल्याबाई घरात आलेल्या द्रव्याचे हिशेब फार हुशारीने ठेवू लागली हे जेव्हा सासरे मल्हाररावांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी तिला युद्ध प्रसंगाचे शिक्षणही द्यायला सुरुवात केली. तिची हुशारी, बुद्धीचा तल्लखपणा आणि कामाची तडफ पाहून त्यांनी मुत्सद्दीपणाचे धडे देण्याबरोबर राज्यकारभारातील बारकावे हळूहळू समजावून सांगण्यास सुरुवात केली. अहिल्या जात्याच बुद्धिमान आणि कल्पक होती. मल्हाररावांच्या मार्गदर्शनाखाली दौलतीच्या कारभाराचे शिक्षण, त्यातले बारकावे तिने मोठ्या हुशारीने व जाणकारीने समजावून घेतले. मल्हारराव ज्या वेळी युद्ध भूमीवर जात आणि संस्थानापासून दूर असत त्यांच्या अनुपस्थित अहिल्याबाई राज्यकारभाराची सूत्रे मोठ्या ताकदीने पेलू लागली. मल्हाररावांची उणीव तिने प्रजाजनांना तसेच कारभाऱ्यांना जाणवू दिली नाही. तिच्या शिस्तप्रिय कारभारावर शासनातील सेवकवर्ग खूष झाला तसेच प्रजाजनही तिच्या कारभाराची स्तुती करू लागले. मल्हाररावांच्या मनात अहिल्याच्या कारभाराची एवढी खात्री झाली की ते आता बिनधास्तपणे इंदूरच्या बाहेर मोहिमांवर जाऊ लागले. मनात अनेक मनसुबे ते बिनधास्तपणे आखू लागले. अहिल्याबाईंचे राज्यकारभाराचे नैपुण्य व हुशारी पाहून मल्हाररावांनी आपल्या संस्थानाचे सर्व सरकारी हुकूम व जाहीरनामे तिच्या नावे काढण्याचे ठरविले आणि तशी तात्काळ अंमलबजावणी केली.

आपले अनुभवी सासरे मल्हारराव होळकर यांच्याकडून

कारभारातील बारकावे शिकून घेतल्यानंतर अहिल्याबाईनी राज्याचा महसूल, राज्यकारभार, न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि कायदा आदी बाबींवर पूर्ण नियंत्रण ठेवले. राज्याच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेला दारुगोळा, तोफखाना, सैन्याची गरज आणि त्यांना लागणारी रसद या सर्व बाबींवर तिचे सूक्ष्म लक्ष असे. त्यामुळे मल्हारावांना या बाबींकडे लक्ष देण्याची कधी गरज पडली नाही.

एकूण आपल्या सूनेची बुद्धिमत्ता, हुशारी, काम करण्याची तडफ या गुणांमुळे मल्हारराव आपल्या सूनेला आपला मुलगा मानू लागले. आपल्या कर्तृत्वहीन मुलाची उणीव आपल्या कर्तृत्ववान सर्वगुणी सूनेनं भरून काढली होती याचा त्यांना खूप आनंद झाला होता.

■

३. पती खंडेरावाचा मृत्यू

मल्हाररावांच्या कर्तृत्ववान व सुखी आयुष्यात त्यांचा मुलगा खंडेराव हा एखाद्या मिठाच्या खड्यासारखा होता. त्याच्या व्यसनांबद्दल मल्हाररावांना जसा तिटकारा होता, तसेच त्याच्या कर्तबगारीविषयी विश्वास वा अभिमान वाटत नव्हता. मात्र खंडेरावाची पत्नी अहिल्याबाई हिने त्याला गुणदोषांसकट स्वीकारले होते. त्याचा आपल्याला काही त्रास नाही वा कारभारात तो कोणतीही ढवळाढवळ करीत नाही या त्याच्या गुणांवर ती समाधान मानत होती. लग्नानंतर एका तपाने म्हणजे १७४५ साली अहिल्याबाईस पुत्रसुखाचा लाभ झाला. त्याचे नाव मालेराव ठेवण्यात आले. मुलाच्या पाठीवर तीन वर्षांनी तिला मुलगी झाली. तिचे नाव मुक्ता करण्यात आले.

आता मल्हाररावांच्या घरात दोन नातवंडे आली. त्यांच्या बालपणीच्या लीला पाहताना मल्हारराव व गौतमाबाईंचा आनंद गगनात मावत नव्हता, त्यांच्या सुखाला सीमा राहिली नाही. दोन्ही नातवंडाचे बोबडे बोल, त्यांचे घरात दुडुदुडु धावणे बघताना अहिल्याबाईसुद्धा आपल्या संसारात नवरा खंडेरावाच्या रुपानं आलेल्या दुखऱ्या काट्याचं दुःख विसरून गेली. पतीकडून आपल्या आयुष्यात सुख असे फारसे आले नाही, तरी दैवाने पदरात घातलेल्या दोन गोजिरवान्या मुलांकडे पाहताना त्या माऊलीचे अंतःकरण आनंदाने व समाधानाने भरू गेले

होते. दोन छोट्या मुलांचे लालनपोषण करताना अहिल्याबाईंची ८-९ वर्षे हा हा म्हणता सरली. मालेराव आता नऊ वर्षाचा झाला आणि मुक्ता सहा वर्षांची. सासरे मल्हाररावांनी साठी ओलांडली होती तर अहिल्याबाई तिशीच्या घरात पोचली होती. तिचे लग्न होऊन वीस वर्षे झाली होती आणि वयामुळेच व अनुभवाने वयात पोकळपणा आला होता. तिचा नवरा खंडेरावाचे मात्र वय वाढण्यापलीकडे त्याच्यात काही बदल घडला नव्हता. त्याचा व्यसनी, बाहेरख्याली स्वभाव तसाच राहिला. शुद्धीवर असेल तेव्हा तो आपल्या बायकोशी समजदारीने बोलत असे. एव्हाना तिची योग्यता त्याच्या लक्षात आली होती.

१७४० साली थोरले बाजीराव यांचे निधन झाले. त्यांचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवा झाला. नानासाहेब मुत्सद्दी होता परंतु बापासारखा शूर व लढवय्या नव्हता. बीजेच्या चंद्राप्रमाणे चढत्या कलानी मराठेशाहीचे वैभव वाढू लागले होते. त्याचाच एक भाग म्हणून राघोबादादांच्या नेतृत्वाखाली पहिली स्वारी सुरू झाली. त्यांच्याबरोबर मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, यशवंतराव पवार आदी सरदार होते. राघोबा पाऊण लक्ष फौजेनिशी नर्मदा पार झाले. वाटेत खंडण्या घेत राघोबादादा फौजेसकट सुरजमल जाटाच्या मुलुखापर्यंत आले. खरं म्हणजे सुरजमल व मराठ्यांचे शत्रुत्व नव्हतं. हा झगडा सामोपचाराने मिटू शकला असता. पण राघोबादादा इरेस पेटले. त्यांची विचारशक्ती कमी पडली. त्यांनी जाटांकडे १ कोटी रुपये खंडणी मागितली. सुरजमलने ४० लाख रु. खंडणी देण्याची संमती दाखवली आणि वाटाघाटी फिसकटल्या. सुरजमल द्रव्यबळाने व फौजबळाने सामर्थ्यवान होता तो प्रतिवादास तयार झाला.

सुरजमल जाट कुंभेरीच्या किल्ल्यात होता. राघोबाने किल्ल्यावर हल्ला केला. आठ-पंधरा दिवस झाले तरी किल्ला हाती येत नव्हता.

या लढाईत मल्हाररावांबरोबर अहिल्याबाई होती. ती युद्धाचे कामात त्यांना साहाय्य करीत होती तसेच मराठ्यांच्या बाजूने कुंभेरीच्या वेढ्यात अहिल्याबाईचा नवरा खंडेरावही लढत होता. खंडेरावास भांग पिण्याची सवय दांडगी होती. नेहमीप्रमाणे तो बेहोष होता. भोजनोत्तर तो निशाणापाशी आला आणि शत्रूपक्षाच्या बंदुकीच्या गोळ्याने तो टिपला गेला, त्यात खंडेरावाचे निधन झाले. (१९ मार्च १७५४) अहिल्याबाईचं सौभाग्य नाहीसं झालं होतं, तिला वैधव्य प्राप्त झालं होतं.

मल्हाररावास मुलगा खंडेरावाचं निधन झाल्याची दुःखद बातमी कळली आणि तो कावराबावरा झाला. एकूलता एक मुलगा आणि त्याला असे अपघाती मरण यावे याने तो हादरू गेला. आपल्या अंगावर जणू पर्वत कोसळला असे वाटून तो देहभान विसरला. खरं म्हणजे मल्हारराव निधड्या छातीचा लढवय्या शूर पुरुष होता. मात्र पुत्र शोकाने त्याचा धीर खचून गेला. आणि तो वेडापिसा झाला. राघोबादादा आणि इतर सरदार त्याच्याभोवती जमले आणि त्यांनी त्याला धीराच्या चार गोष्टी सांगितल्या, त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

एका बाजूला मल्हारराव मुलगा गमावल्याचा तर दुसऱ्या बाजूला अहिल्याबाई आपल्या नवऱ्याच्या निधनाचा शोक करीत होती. तिची धर्मनिष्ठा प्रबळ असल्यामुळे तिने शोक आवरला, त्या काळाच्या पद्धतीप्रमाणे पतीबरोबर सती जाण्याचा निश्चय केला. पुत्र शोकाने पीळलेल्या मल्हाररावाने आपल्या सूनेचा सती जाण्याची तयारी पाहिली आणि त्याचा दुःखाचा भडका उडाला. खंडेरावाइतकेच किंवा कांकणभर अधिक त्याचे अहिल्याबाईवर प्रेम होते. राज्याच्या कारभाराची भिस्त तिच्यावर होती. तिचा मुलगा भालेराव वयाने लहान तर स्वतः मल्हारराव वृध्द झाला होता अशा परिस्थितीत अहिल्याबाई सुद्धा मागे राहिली नाही तर आपली व राज्याची स्थिती काय होईल याची कल्पना तो

करू शकत नव्हता.

भरल्या आवाजात मल्हारराव अहिल्येला म्हणाले, ‘बाई, मला उन्हाळा करत्येस की काय? तू माझे पाठीवर आहेस तर अहिल्या मेली व खंडू आहे हा मला भरवसा. माझी हीच खात्री आहे की, माझा मुलगा राहिला. माझी सारी दौलत सारे राज्य सांभाळावयाचे, ते काम तूच माझा खंडू आहेस असे समजून मी तुझ्याकडून करीत होतो... आता असे हे सारे सौभाग्य कायम ठेवणे तुझ्याच हाती आहे. याचा विचार कर व या म्हाताऱ्याची कीव येऊ दे’ आपल्या वृद्ध सासऱ्याच्या विनवणीमुळे आणि मनभरणीमुळे अहिल्याने पति दुःख गिळून आपला सती जाण्याचा निर्धार मागे घेतला. राज्याची जबाबदारीही घेण्यासाठी ती तयार झाली.

पती खंडेरावाच्या निधनानंतर अहिल्याबाईच्या नावे राज्यकारभार होऊ लागला. सासरे मल्हाररावांची तिच्या बारीकसारीक कामावर देखरेख असे. अहिल्याबाईचा कारभार खूप वाखाणण्याजोगा होता. उत्तम कारभारामुळे तिची कीर्ति पुणे, हैदराबाद दिल्ली इत्यादी दूरदूरच्या

ठिकाणी जाऊन पोचली. मल्हारराव होळकरांचे वजन त्यावेळच्या राजकारणात फार होते. त्यांनी स्वतःच्या पराक्रमावर पावणे दोन कोटीचा मुलुख मिळवला होता. त्यामुळे पेशव्यांच्या दरबारात त्यांना खूप मान होता, आदराचे स्थान होते. मल्हाररावांनी आपल्या अनेक नातेवाईकांना साहाय्य करून प्रतिष्ठा मिळवून दिली होती. या मंडळीत तुकोजी होळकर नावाचा एक गृहस्थ होता. तुकोजीनीसुद्धा मल्हाररावांची अत्यंत प्रामाणिकपणे मनोभावे सेवा केली. त्याच्या एकनिष्ठता व प्रामाणिकपणा या गुणांमुळे मल्हाररावांनी त्याला आपला पुत्र मानले आणि त्याला पहिल्या प्रतीच्या सरदाराचा मान दिला.

खंडेरावाच्या निधनानंतर ७ वर्षांनी पानिपतचं युद्ध पेटलं. आणि त्यात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. काहीकाळ मराठेशाहीच्या वैभवाला ग्रहण लागले. गतवैभव परत प्राप्त करावे या हेतुने मराठ्यांनी उत्तरेच्या स्वारीचा घाट घातला. वाटेत मल्हाररावांची प्रकृती बिघडली. फिरग्यांचे पारिपत्य करावे आणि कुंभेरीत खंडेराव कामी आला याचा बदला घेतला जावा या दोन गोष्टी मनात ठेवून मल्हाररावांनी शेवटचा श्वास घेतला. त्यावेळी त्यांच्याजवळ महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर होते. मल्हाररावांना तुकोजींनी दोन गोष्टी शाश्वत केल्यानंतर त्यांच्या पिंडाला काकस्पर्श झाला.

हा प्रसंग घडला तेव्हा अहिल्याबाई माळव्यात होती. सासऱ्याच्या निधनाच्या बातमीने तिला अति दुःख झाले. मल्हाररावांच्या छत्राखाली तिने आतापर्यंत अनेक मोठाली कामे केली होती. ते छत्र गेले आणि ती अनाथ झाली. त्यात तिचा मुलगा अजाण होता. तिने मनाची समजूत घातली आणि येणाऱ्या प्रसंगाना धैर्याने तोंड देण्याचा निर्धार केला. तिची सासू गौतमाबाई पाच वर्षापूर्वी तिला सोडून गेली होती.

तिच्या सत्वाची खरी परीक्षा आता सुरू झाली होती.

■

४. राज्यकारभाराला प्रारंभ

मल्हारराव होळकर यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा नातू व अहिल्याबाईंचा मुलगा मालेराव याला पेशव्यांकडून सरदारकीची वस्त्रं इ. स. १७६६ साली रीतसर लाभली. इंदूर राज्याचा तो मुखत्यार बनला. त्यावेळी त्याचे वय होतं एकवीस वर्षे. पण वयाच्या मानाने त्याची बुद्धी अगदीच बेताची होती. यातली दुर्दैवाची बाब अशी की, त्याने आपली आई अहिल्याबाईंचे चांगले गुण उचलण्याऐवजी आपले वडील यांचेच बरेचसे दुर्गुण उचलले होते. राजकारणाला आवश्यक

असणारा मुत्सद्दीपणा, हुषारी त्याच्या अंगात बिलकुल नव्हती. मल्हाररावांना इंदूर संस्थानाची जहागीर पेशव्यांकडून त्यांच्या मर्दुमुकीवर बहाल करण्यात आली होती, पराक्रमाच्या जोरावर त्यांनी अनेक मुलुख जिंकले होते. त्यांच्या पश्चात मालेरावाकडे ७४ लाख वार्षिक उत्पन्नाचा मुलुग आणि १६ लाख धनाची रोकड आयती आली होती. हे सगळे सांभाळण्यासाठी तो अगदी अयोग्य होता, त्याची तशी पात्रता नव्हती. त्याच्या स्वभावात चंचलता होती, स्वच्छंदीपणा हा त्याचा स्थायीभाव होता. जनावरे पाळण्याचा त्याला भारी शोक होता. वाघ, चित्ते, हत्ती असे प्राणी तो बाळगी आणि त्यांच्या क्रीडा पाहण्यात दिवस दिवस घालवी.

मालेरावाच्या गोष्टी इथेच थांबत नव्हत्या. त्याच्या लहरी व विक्षिप्त स्वभावामुळे सर्वांना त्याचा त्रास होत असे. त्याला अधूनमधून वेडाचे झटके येत. बापाप्रमाणे त्याला दारुचे व्यसन होते. त्यांच्या वेडसरपणाचे चाळे अहिल्याबाईंच्या कानावर आले की, त्या कपाळाला हात लावून नशिबाला दोष देत बसत. कधीतर वैतागाने म्हणत, ‘माझे मुळी नशीब खोटे आहे. नाहीतर असला कुलदीपक पुत्र माझ्या पोटी जन्मास आला नसता. पतिराजाचा तसा प्रकार आणि चिरंजीव हे असे दिवटे!’

एकंदरीत अहिल्याबाईला गृहसुख म्हणून जे म्हणतात ते काही आयुष्यात अनुभवास मिळाले नाही. मात्र त्यांच्या अंगी वसत असलेली धर्मशीलता आणि वैराग्यवृत्ती यामुळे त्यांनी आपले आयुष्य उत्तम प्रकारे सार्थकी लावले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर शिरस्त्याप्रमाणे इंदूर संस्थानच्या सुभेदारीचा अधिकारजरी मालेरावला मिळाला तरी तो नामधारी राहिला. कारण पेशव्यांनाही त्याच्या कर्तृत्वावर विश्वास नव्हता. मालेराव एवढी मोठी जबाबदारी सांभाळण्यास लायक नसल्याचे

लक्षात आल्यावर माधवराव पेशव्यांनी सूज्ञपणे संस्थानच्या कामकाजाची सनद देऊनही काम करण्याचा खरा अधिकार अहिल्याबाईंना दिला होता. कारण अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाबद्दल पेशव्यांची पूर्ण खात्री होती आणि त्यांचा तिच्यावर पूर्ण विश्वास होता.

मालेराव वेडसर आहे हे सर्वांना ठाऊक होते. पण सुभेदारीच्या गादीवर तो बसला आणि त्याच्या वेडाचे प्रकार बेसुमार वाढले. आजूबाजूचे लोक या प्रकाराने वैतागले. त्याच्या वेडसरपणाचे एक उदाहरण नामी आहे. अहिल्याबाई धार्मिक वृत्तीच्या असल्याने दानधर्म, पूजाअर्चा या गोष्टी तिच्याघरी नित्याच्या असत. ब्राह्मण मंडळीना ती बराच मानसन्मान देत असे. घरी येणारे हेच भटभिक्षुक मालेरावाच्या वेड्या कृत्याला बळी पडत. वस्त्रे, जोडे, भांडी वगैरे दान देण्याच्या बहाण्याने तो ब्राह्मण मंडळीना घरी जमवी. त्यांना वस्तुदान देतांना वस्त्रांमध्ये व भांड्यांमध्ये तो विंचवासारखे प्राणी लपवून ठेवी. ब्राह्मणांनी ती दाने हातात घेतली की त्या वस्तुंमधील विषारी प्राणी त्यांना दंश करीत. घाबरून ते ब्राह्मण आरडाओरडा करायचे. असे झाले की, मालेराव आनंदाने नाचे. भिक्षुकमंडळी इतके लोभी होते की, मालेराव करीत असलेले हे अघोरी प्रकार माहीत असूनही ते दाने स्वीकारण्यास तयार असत. कित्येकदा तर असे होई की, विषारी प्राणी चावला न चावला तरी ते दंश झाल्याची बतावणी करून मालेरावला हसवीत आणि आपले दान घेऊन जात. हे प्रकार पाहून अहिल्याबाईला खूप दुःख होई आणि त्या म्हणत, माझ्या मेलीच्या पोटी राक्षस जन्माला आलाय!'

अखेरीस वाईटाचा कधीतरी अंत होतो त्याप्रमाणे मालेरावाचा जीव घेणारी घटना घडली. महेश्वरात जडी बुडी करणारा एक गृहस्थ होता. आपल्या वाड्यातील एका दासीशी हा गृहस्थ चोरटे संबंध ठेवतो अशी शंका मालेरावास आली. त्याला भयंकर संताप आला

आणि तो संतापाच्या भरात बरळू लागला. त्याच्या वेडेपणाची सर्वांना भीती वाटू लागली आणि खबरदारीचा उपाय म्हणून अहिल्याबाईंनी त्याला नजरकैदेत ठेवले. त्यांनी वाड्यातील दासीच्या त्या प्रकरणाची चौकशी सुरू केली. त्यासाठी एकदा तो जडीबुटीवाला वाड्यात आला होता. मालेरावाने त्या गृहस्थास पाहिले. सर्वांची नजर चुकवून तो खोलीच्या बाहेर आला आणि वेडाच्या भरात त्याने जडीबुटीवाल्याचा खून केला. अहिल्याबाईंनी रितसर चौकशी केली आणि त्यात तो जडीबुटीवाला निर्दोष असल्याचे सिद्ध झाले. हे समजल्यावर मालेराव खूपच बेचैन झाला. त्याच्या डोक्यावर या प्रकाराचा भयंकर परिणाम झाला. तो, 'खून खून! मी तुझा सूड उगवीन' अशी तोंडाने सतत बडबड करू लागला.

त्या काळाच्या पद्धतीप्रमाणे आजूबाजूचे लोक जडीबुटीवाल्याचे भूत मालेरावास छळत आहे, असे उघड बोलू लागले.

त्या भूताने आपल्या मुलाचा पिच्छा सोडावा म्हणून अहिल्याबाईने नाना प्रकारचे उपाय सुरू केले होते. मांत्रिकानाही दाखवून झाले.

काही उपयोग होत नव्हता. आता मालेराव अंगाला पिळ देऊन मोठमोठ्याने बरळू लागला होता. त्याप्रकाराने त्या प्रेमळ मातेच्या काळजाचे पाणी होई. अहोरात्र त्या पुत्राच्या बिछान्याजवळ बसून रहात. मुलावर बसलेल्या भूताला उद्देशून त्या म्हणत', तू माझ्या मुलाचा पिच्छा सोड. मी तुझ्यासाठी देऊळ बांधीन, तुझ्या कुटुंबाला जमीन देईन. त्यावर तो समंध उत्तर देई, मी काही गुन्हा केला नसता मला तुझ्या मुलाने का मारले? मी जीवास एक जीव बळी घेईन तेव्हाच तृप्त होईन.'

असे ऐकता अहिल्याबाईंच्या हृदयाचा ठोका चुकत असे, त्या अस्वस्थ होत.

शेवटी अंगावर शहारे आणणाऱ्या हाल अपेष्टा भोगून मालेरावचे इंदूरात निधन झाले (२७ मार्च १७६५). मुलाच्या निधनाने अहिल्याबाईंना खूप दुःख झाले. वेडा का होईना त्यांनी त्याला नऊन महिने उदरात वाढवला होता. आपल्या कर्तव्याकडे पाहून त्यांनी दुःखाचा आवंढा गिळला.

एका मागून संकटे येत होती तरी अहिल्याबाई खूप धीराच्या त्यामुळे त्या खचून गेल्या नाहीत. आता मुलगी मुक्ता, नातू नथोबा (मुक्ताचा मुलगा) आणि जावई यशवंतराव फणसे एवढी जवळची मंडळी मागे उरली होती.

मालेरावाच्या निधनानंतर इंदूर संस्थानचा कारभार पुढे नेणे आवश्यक होते. अहिल्याबाईंनी त्याची चोख व्यवस्था केली. तिने आपला आप्त तुकोजी होळकर यांच्यासाठी पेशव्यांकडून सरदारकी मिळविली. आता फौजेची व मोहिमांची जबाबदारी तुकोजीवर टाकण्यात आली तर दौलतांचा व खाजगीचा कारभार अहिल्याबाई जातीने पाहू लागल्या. इंदूपासून जवळ नर्मदाकाठी महेश्वर नावाचं ठिकाण त्यांनी आपल्या संस्थानासाठी निवडलं आणि इथून ती राज्यकारभार हाकू

लागली. अहिल्याबाईंच्या वास्तव्यामुळे महेश्वराचं महत्त्व आणि वैभव दिवसागणिक वाढत गेलं. तिथे नवनवीन वाडे, मंदिरे, व घाट बांधले गेले आणि या ठिकाणच्या सौंदर्यात वाढ होत गेली.

कारभाराची सूत्रे हाती आल्यानंतर व स्वतंत्रपणे कारभार सुरू झाल्यानंतर प्रारंभीच एका संकटाचा तिला सामना करावा लागला. मात्र त्यातूनही ही धीराची स्त्री सहिसलामत बाहेर आली. त्या कटाचा सूत्रधार होता राघोबादादा.

थोरल्या बाजीरावाचा हा मुलगा रघुनाथराव उर्फ राघोबा दादा. पेशवाईतील हा कालिपुरुष. त्यावेळचे पेशवे माधवराव यांच्याशी त्याची नेहमी भांडणे होत. एकदा राघोबादादाला जेव्हा कळले की अहिल्याबाईंकडे बक्कळ पैसा आहे तेव्हा त्याची बुद्धी फिरली व तिचा पैसा लाटण्यासाठी त्या संस्थानावर स्वारी करण्याचे त्याने ठरवले. अर्थात ही त्याची एकट्याची बुद्धी नव्हती. इंदूर संस्थानचा दिवाण गंगाधर यशवंत याने त्याला फितवले होते. गंगोबाने राघोबादादास निरोप धाडला की, 'द्रव्यसंचय करण्यास ही चांगली संधी आहे. बिनवारसी सरदारी खालसा तरी करावी आणि राज्य आपण चालवावे.'

गंगोबाच्या सल्ल्याप्रमाणे राघोबादादाने अहिल्याबाईच्या संस्थानावर स्वारी करण्याचा बेत नक्की केला. ही बातमी मल्हाररावांची रक्षा हरकूबाई व तिची कन्या उदाबाई वाघमारे यांना कळली. त्या दोघी अहिल्याबाईंना म्हणाल्या, 'ब्राह्मण (राघोबा) हरामखोरीस आला आहे. असाच घरबंध केला तर ठीक, नाहीतर पुढे आपणास घोड्याचे भरडावे लागतील आणि आम्हास भीक मागावी लागेल.

राघोबाच्या कारस्थानाचे वृत्त कानावर आले तरी अहिल्याबाई डगमगली नाही. ती आपले कारभारी शिवाजी गोपाळ व राजाराम रणसोड यांना धनीपणाच्या जबरेनं म्हणाली, 'मेल्याने (गंगाधर तात्या) हरामखोरी आरंभली आहे. परंतु मी बाई माणूस म्हणून घाबरेन असे

समजू नका. खांद्यावर भाला टाकून उभी राहीन, तेव्हा श्रीमंताना (पेशवे) दौलतीस अवघड होईल. आमच्या वडिलानी खूषमस्करी व नाचेपणा करून ही दौलत मिळवली नाही तर तलवारीने पराक्रम करून ती प्राप्त केली आहे. आम्ही शिलेदार आहोत. वडिलांच्या चाकरीप्रमाणे चाकरी घेतल्यास हजर आहोत. मात्र तुमची आमची धुणीपाणी (ऋणानुबंध) सरली असल्यास मोगलाईत जाऊन चाकरी करू अथवा फिरंग्याकडे जाऊन त्यांची चाकरी करु. आम्हास पाहिजे ते करु. पण ब्राह्मण (गंगाधर तात्या) म्हणती दौलतीचा अभिलाष करू तर ते कालत्रयी होणार नाही.'

एवढं बोलून अहिल्याबाई शांत बसली नाही. ठरल्याप्रमाणे तिने सरदारांकडे चिठ्ठ्या रवाना केल्या. उदेपुरास तुकोजी होळकर यास पत्रे गेली की, फौज जिथे असेल तिथे कायम ठेवून तुम्ही जेवत असल्यास पाणी प्यावयास येथे आम्हापाशी यावे. तिने राघोबाचं कारस्थान आपला वकील दादोबा वाघोलीकर याच्यामार्फत माधवराव पेशव्यांना कळवले. तेव्हा पेशव्यांनी अहिल्याबाईची बाजू उचलून धरली आणि उत्तर दिले

की, 'तुमचे दौलतीविषयी जो पापबुद्धी ठेवील त्याचे पारिपत्य बेलाशक करावे.'

इकडे राघोबाची संमती मिळाल्यामुळे गंगाधर तात्या शिरजोर झाला आणि अहिल्याबाईंना सामोपचाराच्या चार गोष्टी सांगाव्या व राज्यकारभार आपल्या हाती घ्यावा या सुप्त इच्छेने अहिल्याबाईंना भेटण्यास गेला. तेव्हा स्वाभिमानी अहिल्याबाई त्याला स्पष्टपणे म्हणाल्या, 'हा बेत होळकरांच्या इभ्रतीस डाग लावणारा असल्याने मी त्यास कधीच अनुमोदन देणार नाही. आमच्या कार्यात राघोबाला हात लावायचा काय अधिकार? माझ्यावर कितीही संकट आले तरी माझा अधिकार बजावण्यास मी कालत्रयी माघार घेणार नाही.'

अहिल्याबाईंच एवढे स्पष्ट व कडक बोलणेही गंगोबाना समजले नाही. कारण त्यांचे लोभी मन दुसरा कुठला विचारच करू शकत नव्हते. त्याने आक्रमणाची तयारी चालू ठेवली. दरम्यान अहिल्याबाईंनी एक मोठा मार्मिक रोकडा निरोप राघोबादादाकडे पाठवला व त्यात लिहिले, 'आपण एका स्त्रीबरोबर युद्ध करू नये. मी तर बोलून चालून एक स्त्रीच! माझा जर युद्धात पराभव झाला तर मला कोणीही नावे ठेवणार नाहीत. पण जर यदाकदाचित युद्धात तुमचा पराभव झाला तर सर्व जगात तुमचे हसे होईल, तुमच्या नावास कलंक लागेल. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. कारण ते तुमच्या हिताचे आहे. आमचे त्यास काही नुकसान नाही.'

या निरोपाने राघोबाचे मन विचारात पडले. स्वारीत महादजी शिंदे होते. त्यांनी स्पष्ट मत दिले की, 'अशा कामात आमच्याकडून साहाय्य होणे नाही.' पेशव्यांच्या दरबारातही बऱ्याच कारवाया झाल्या. पण त्या त्यांना अनुकूल नव्हत्या. खुद्द माधवराव पेशव्यांचा विरोध होता.

इकडे अहिल्याबाईंचा निरोप मिळताच तुकोजी होळकर ताबडतोब

येऊन दाखल झाला होता. इतर सरदारांचे निरोप आले की मल्हारराव होळकरांचे उपकार ज्याच्यावर नाहीत असा कोण आहे? आम्ही सर्व त्यांचे ऋणी आहोत. याप्रसंगी आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत असे बिनधास्त समजावे.'

गोष्टी एवढ्या थराला पोचल्या तरी राघोबाचा निर्णय होत नव्हता. त्याची फौज क्षिप्रेत येऊन पोचली. आलेला प्रसंग पाहून तुकोजीने राघोबाकडे सांडणीस्वारमार्फत निरोप पाठवला की, 'क्षिप्रा उतरला असाल तर तुमची आमची तलवार चालेल. याचा मनाशी विचार करून पाऊल टाकणे.'

आता राघोबा विचार पडला. त्याच्या लक्षात आले की आपणास कोणाही सरदाराचे सहाय्य नाही, माधवराव पेशव्यानांही आपले काम मान्य नाही. अशा स्थितीत आगळीक केल्यास आपणास लौकिक मिळणार नाही स्वार्थ साधला नाही, तर तोंड काळे होऊन कुठेही पत राहणार नाही. राघोबाने हे सर्व लक्षात घेऊन आपला होरा बदलला आणि तुकोजी होळकराकडे कारकून पाठवून कळविले की, मालेराव बावारले म्हणून आम्ही शोक-समाचारासाठी येत आहोत. तुम्ही विपर्यास करू वाकडी गोष्ट का समजत आहात?

तुकोजीने राघोबाच्या निरोपास योग्य असे उत्तर पाठवले. त्यात लिहिले, 'आपण शोक समाचारासाठी येत आहात तर मग ही फौज जमा करावयाचे कारण काय आहे? आपण पालखीत बसून एकटे यावे. आमची फौज, घरदार, दौलत वेगळी आहे का? आमचे घर आपलेच आहे. आपण येथे चांगल्या हेतुने खुशात व आनंदाने यावे.'

अहिल्याबाईंच्या मनात संशय आला आहे, तो दूर करावा म्हणून राघोबादादा पालखीमधून मोजके लोक बरोबर घेऊन तुकोजीच्या छावणीत आले. तुकोजी पाय उतार होऊन पुढे येऊन नतमस्तक झाले. दोघेही कूच करून इंदुरास आले. राघोबादादांनी महिनाभर

मुक्काम केला. चार-पाच बैठकीत बाईसायबांशी संस्थानाविषयी बोलणी झाली. अहिल्याबाई बाईमाणूस पण त्यांचे वर्तन पक्के होते. त्यांची स्नानसंध्यानिष्ट पूजाअर्चा पाहून राघोबादादा मनात वरमले. अहिल्याबाईंच्या तेजापुढे राघोबादादाचे वागणे फिके पडले. महिनाभर राहून माधवराव पेशव्यांनी पाठवलेली सुभेदाराची वस्त्रे तुकोजी होळकरास देऊन राघोबादारांनी माघारी कूच केले.

संस्थानावर आलेल्या पहिल्या संकटाचा शेवट गोड झाला अहिल्या-बाईंतर्फे निरोपावर सहाय्य करण्यासाठी धावून आलेल्या सरदारांना थाटाची मेजवानी देण्यात आली. वस्त्रांलकार देऊन सर्वांचा गौरव करण्यात आला.

या स्पर्धा प्रकरणात इंदूरचा दिवाण गंगाधर यशवंत मात्र आयुष्यातनं उठला. तो काही परत उभा राहिला नाही. असा उपद्व्यापी माणसास मोकळे ठेवणे अयोग्य वाटून पेशव्यांनी त्याची रवानगी कैदेत केली.

अहिल्याबाईंची नीति चांगली, वर्तन चांगले. त्यामुळे वा संकटातून ती सुखरुपपणे बाहेर पडली आणि पुढे आपले संस्थान स्वतंत्र बुद्धीने व हिंमतीने चालवू लागली.

■

५. संस्थानाबाहेरील राजकारण

राघोबादादाचा नक्षा खंबीरपणे उतरल्यानंतर अहिल्याबाईंच्या चातुर्याचा, धैर्याचा आणि कर्तृत्वाचा लौकिक पुरता हिंदुस्थानात पसरला. पेशवे, शिंदे इंग्रज, मोगल आणि निजाम अशा सर्वांना तिच्या चातुर्याचे आणि कणखरपणाचे कौतुक वाटू लागले. मल्हारराव होळकरांनी आपल्या हयातीत पंधरा सोळा कोटींचा ऐवज जमा केला होता. या अवाढव्य संपत्तीची रास अहिल्याबाईकडे आली. तिच्या या खाजगी संपत्तीवर अनेक स्वार्थी माणसांचा डोळा होता. राघोबा दादा, महादजी शिंदे, हरिपंत तात्या फडके, नाना फडणीस, नारो गणेश इत्यादी सरदारांचा व मुत्सदांच्या अहिल्याबाईजवळील या गडगंज संपत्तीबद्दल तिचा हेवा वाटे. या संपत्तीचा काहीभाग आपल्या पदरात पाडून घेण्यासाठी काहींनी प्रयत्नही केले. राघोबादादाचा पहिला प्रयत्न तिने मोडून काढला होता. संस्थानचे सरदार तुकोजी होळकर व अहिल्याबाई यांचे अनेक खटके या खाजगी दौलतीवरून उडाले आहेत. त्यांच्यामध्ये विरोधाचे चार-पाच महत्त्वाचे प्रसंग घडले. पण ती प्रकरणे हातघाईवर येण्यास तुकोजीचा भोळसर स्वभाव व त्याचा स्वार्थी दिवाण नारो गणेश कारणीभूत होता.

तुकोजीकडून खर्चाचे हिशेब वेळेवर येत नसत व आलेलेही खोटे

असत. त्यामुळे तक्रारी होत. तुकोजीपुढे पेच पडे, फौजांचा पगार थांबे. आणि मग या बाबतीत पुण्याला नाना फडणीसांकडे तक्रारी जात 'बाई खर्चास देत नाही, निष्कारण देवधर्मात पैसा उधळते' अशा खोट्या तक्रारी तुकोजी नानांकडे करी. खरं म्हणजे अहिल्याबाईसारखी एक स्त्री पुणे दरबार सांगेल त्याप्रमाणे वागत नाही हा सल नानांच्या मनात होता तसेच राज्याचा कारभार एकमुखी असल्याशिवाय सर्व सुरळीत होणार नाही असे वाटून नानांनी महादजी शिंदेना पत्र धाडले. त्यावर महादजीने उत्तर दिले की, 'पैका व बुद्धी बाईकडे मजबूत आहे तिचा अपमान आम्हाला सहन होणार नाही.' अशा प्रकारे अहिल्याबाईंना नमविण्याचे नानांचे प्रयत्नही विफल आहे. (फौजेची जबाबदारी तुकोजीची तर दौलतीचा कारभार अहिल्याबाईकडे या दोमुखी कारभारावर नानांचा आरोप होता.)

असे असले तरी अहिल्याबाईंची श्रीमंत पेशव्यांच्या ठिकाणी परमनिष्ठा होती. आपले काम बाजूला ठेवून पेशव्यांचे काम पहिले करावे यावर तिचा मोठा कटाक्ष असे. माधवराव पेशवेसुद्धा अहिल्याबाईंबद्दल वाटत असलेला आदर पत्रांमधून वारंवार व्यक्त करीत. एकूण माधवराव, सवाई माधवराव व नाना फडणीस इत्यादींशी अहिल्याबाईंचे संबंध स्नेहाचे राहिले. बाईंच्या मनात आदराची भावना राहिली. सवाई माधवरावाच्या लग्नाला तिला जाता आले नाही मात्र पेशव्यांकडे योग्य तो आहेर तिच्याकडून गेला. पेशव्यांनीसुद्धा तिचा योग्य सन्मान केला. तिला मोत्याची माळ, पातळ, चोळी, पैठणी व शाल पाठवून दिली. हे लग्न मोठ्या दिमाखात पार पाडणाऱ्या नाना फडणीसांविषयी बाईंनी गौरवोद्‌गार काढले.

अहिल्याबाईंने मराठ्यांच्या युद्धात स्वतः कधी भाग घेतला नाही पण युद्धविषयक व इतर राजकारणातील बाबींमध्ये ती तुकोजीस सल्ला देई. आणि तुकोजी तिच्या सूचनांचा आदर करी, त्याप्रमाणे रणनीति

आखी. तुकोजीने अनेक युद्धे केली. बोरघाइचे युद्ध, टिपूशी झालेले युद्ध ही त्यातली प्रसिद्ध युद्धे. या युद्धांच्यावेळी अहिल्याबाईंनी अनेक पत्रे तुकोजीस पाठवल्याची नोंद आहे. परराज्यांशी युद्ध, तह वगैरे संबंधातली कामे ती जातीने पहात असे. तसेच पुणे, हैदराबाद, श्रीरंगपट्टम नागपूर, लखन्नो कलकत्ता इत्यादी ठिकाणी जे वकील नेमले जात किंवा लहान सहान संस्थानात जे गुमास्ते पाठवले जात त्यांच्या नेमणुका अहिल्याबाई स्वतः करी.

तिच्या कारभाराचे वैशिष्ट्य म्हणजे परकी संस्थानाने तिच्या राज्यात कधी आक्रमण केले नाही. तिनेही दुसऱ्याचे द्रव्य मगर राज्य हडप करण्याची अभिलाषा कधी मनात सुद्धा आणली नाही. एक अपवाद म्हणून तिच्या कारकीर्दीत चंद्रावतांचा बंदोबस्त करण्यासाठी तिला लढाई करावी लागली.

मात्र यामध्ये पहिली आगळीक प्रतिपक्षाकडून झाली होती, म्हणून तिला नाईलाजाने युद्ध करावे लागले होते तो प्रसंग असा–जयपूरचा राजा सवाई जयसिंग मरण पावला (इ.स.१७४३) त्यावेळी दोन बंधुमध्ये गादीसाठी संघर्ष झाला. त्यात मल्हाररावांनी एका पक्षास लष्करी साहाय्य करून सिंहासन मिळवून दिले होते आणि त्याबद्दल त्यांना चौसष्ट रुपये मिळाले होते. या बिदागीशिवाय विजयी पक्षाकडून रामपुरा व त्याजवळील प्रदेश हा बक्षिसी म्हणून मल्हारराव होळकरांना मिळाला होता. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर रामपुऱ्यातील चंद्रावतांनी बंड केले. उदेपूरचा राणा अरिसिंह याने चंद्रावतांच्या साह्यासाठी आपल्याकडे सैन्य धाडले. हे बंड १७७१ साली जानेवारीपासून मार्चपर्यंत असे सलग तीन महिने सुरू होते. त्यावेळी तुकोजी होळकर अन्यत्र मोहिमेत गुंतला होता त्यामुळे रामपुऱ्यातील प्रजेच्या रक्षणासाठी अहिल्याबाई स्वतः तयार झाली. शूर शिपाई शरीफ याच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन तिने चंद्रावतांवर चाल केली. पळसुडा गावाजवळ दोन्ही सैन्यात लढाई होऊन सुरुवातीला

होळकरांचे सैन्य मागे हटले. या लढाईत अहिल्याबाईचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता, पण तिच्या मार्गदर्शनाखाली सर्व हालचाली सुरू होत्या. या पराभवाने ती डगमगली नाही. तिने सैन्याला धीर दिला. प्रोत्साहन दिले आणि शेवटी चंद्रावतांचा पराभव झाला. परंतु त्यांचा पक्का बंदोबस्त झाला नाही. अधूनमधून ते उपद्रव देत असत.

पुढे १७८७ साली महादजी शिंदे व रजपूत यांच्यात लढाई झाली. रजपुतांनी महादजीचा पराभव केला. होळकरांचा सुभेदार रजपूतास शरण गेला. मराठ्यांच्या पिछेहाटीमुळे चंद्रावतांनी पुन्हा जोर केला. अहिल्याबाईंनी त्यांचा कायमचा काटा काढण्याचा निश्चय केला. परत एकदा शरीफ भाईच्या नेतृत्वाखाली सैन्यास युद्धास पाठवले आणि आपल्या सैनिकांना सज्जड दम दिला की, 'लढाईत पराभूत झाला तर तुम्हाला ठार मारून टाकीन. मेवाड होते की नव्हते अशी स्थिती करून टाका'

दोन्ही सैन्यात १७८८ मध्ये युद्ध पेटले, मोठी लढाई झाली. राजपुतांचा पराभव झाला. बाईने आपली फत्ते करून दाखवली. तिच्या मर्दुमुकीच्या व शौर्याच्या कथा पुण्यात पेशव्यांपर्यंत पोचल्या. नाना फडणवीसांनी बाईंच्या शौर्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला.

■

६. अंतर्गत राज्यव्यवहार

राघोबादादाचे संस्थानावर आलेले संकट टाळण्यात अहिल्याबाई यशस्वी झाली आणि खऱ्या अर्थाने तिच्या नेतृत्वाखाली राज्याच्या कारभारास साधारण १७६७ सालामध्ये सुरुवात झाली.

अहिल्याबाई आणि तुकोजी होळकर यांनी इंदूर संस्थानचा कारभार हाती घेतला आणि त्यांनी कामाची विभागणी करून घेतली. तुकोजी होळकरकडे सैन्याची जबाबदारी आली तर अहिल्याबाईंकडे राज्य व्यवस्थेचे काम आले. परंतु तुकोजी जेव्हा दक्षिणेस मोहिमेवर वगैरे असे त्यावेळी सातपुड्या पलीकडील मुलुखाची व्यवस्थित तो पाही आणि महेश्वरजवळील भाग व उत्तरेकडील प्रदेश यांच्यावर अहिल्याबाईंची देखरेख असे. आणि तुकोजी होळकर जेव्हा उत्तर भागात जात असे, त्यावेळी त्या भागाची वसूली इत्यादी कामे तो करी आणि उरलेल्या दोन भागांमध्ये अहिल्याबाई लक्ष पुरवण्याचे काम करी. असे असले तरी एकूण राज्य कारभारात कुठली बाधा पडू नये म्हणून तुकोजीच्या कामावर अहिल्याबाई सूक्ष्म नजर ठेवून असे.

संस्थानचा खजिना पूर्णपणे अहिल्याबाईच्या ताब्यात होता. त्यातील द्रव्याचा विनियोग प्रजेच्या कल्याणासाठी व देशातील इतर राजकीय

कार्यासाठी व्हावा हा तिचा निर्णय होता आणि त्याप्रमाणे तो करण्याचा तिचा कटाक्ष असे. या संस्थानी दौलतीशिवाय अहिल्याबाईच्या स्वतःच्या मालकीची खाजगी संपत्ती होती. या द्रव्याचा विनियोग तिने आपल्या मर्जीप्रमाणे केला हे खरे असले तरी त्याचा उपयोग स्वतःच्या ऐषोआरामासाठी नव्हे, तर प्रजेच्या कल्याणासाठी ती करीत असे. शिवाय आपल्या खाजगीतला पैसा ती राज्याच्या कामांसाठी वापरत असे.

स्वतंत्रपणे राज्यकारभार करू लागता काही दिवसातच अहिल्याबाईने आपले राजधानीचे ठिकाण बदलले. इंदूरपासूनजवळच नर्मदाकाठी महेश्वर नावाचं क्षेत्र हे ठिकाण तिने आपल्या राजधानीसाठी निवडले आणि ती तिथेच वास्तव्य करू लागली. तिच्या वास्तव्यामुळे महेश्वराचं वैभव एकसारखं वाढत गेलं. तिथे तिने वाडे, देवळे व घाट बांधले. मल्हाररावांच्या व पुत्राच्या पश्चातही तिने चोख राज्य कारभार केला आणि पेशव्यांकडून शाबासकी मिळवली. चोख राज्यकारभारासाठी तिने अष्टप्रधानांची नियुक्ती केली. यामध्ये गोविंद भानू, विसाजी शामराव देशपांडे, नारोशंकर राघोकर, शिवाजी गोपाल, मुकुंदराव, भारमलदादा होळकर आदींचा समावेश होता. या अष्टप्रधानांच्या मार्फत राज्य कारभाराची घडी व्यवस्थित बसविण्याचा प्रयत्न केला. तसेच राज्यासाठी कारभाऱ्यांची निवड ती स्वतः करी आणि ती करण्यात ती विलक्षण तरबेज होती. त्यामुळे तिला दरबारी मंडळी वारंवार बदलावी लागली नाहीत. प्रत्येक माणसावर दिलेली जबाबदारी त्याने व्यवस्थित व प्रामाणिकपणे करावी यावर तिचा अट्टाहास असे.

अहिल्याबाईंच्या अंगी राजेपणाचा अहंकार बिलकुल नव्हता. प्रजेला तिने तो कधी जाणवू दिला नाही. ती प्रजाजनांबरोबर मिळून मिसळून वागे. त्यावेळी न्याय देण्याची पंचायत पद्धत होती. या सर्व पंचायतींवर अहिल्याबाईंची करडी नजर असे. त्यामुळे पंचायतीमधील

लोक निवाडा देताना खूप काळजीपूर्वक व योग्य तोच निवाडा देत कारण त्यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध अहिल्याबाईंकडे कुणी तक्रार घेऊन जाऊ नये आणि आपल्यावर ठपका येऊ नये अशी त्यांची इच्छा असे. या प्रकारच्या न्याय व्यवस्थेत एक पैचा देखील खर्च होत नसे. अहिल्याबाईंकडे तक्रार घेऊन जाण्यास कोणासही मज्जाव नसे.

परराज्याभिलाषा तसेच परद्रव्याभिलाषा या भावना अहिल्याबाईंच्या मनाला कधी शिवल्या नाहीत. तिला अशा गोष्टींचा किंचितही मोह नसे. कारण प्रजेचे सुख तेच आपले सुख असे मानणारी ती प्रशासक राज्यकर्मी होती. तुकोजी होळकरकडे सैन्याचा कारभार असल्यामुळे तिने स्वतःजवळ सैन्य ठेवले नाही. तिच्या स्वच्छ व्यवहारामुळे प्रजेची भीती कधी वाटली नाही किंवा इतर राजेरजवाडे आपल्या संस्थानावर स्पर्धा करतील याचे भयसुद्धा तिच्या मतात कधी आले नाही. त्यामुळे भय बाळगण्याचे कारण उरले नाही. विशेष म्हणजे त्यांच्या साध्वी आचरणाची, नैतिकतेची सर्वांवर एवढी छाप पडली होती की उदेपूर, जयपूर, जोधपूर, देवास, धार, बदवाणी, चरखारी, झावबा इत्यादी लहानमोठ्या संस्थानातील

लोक आपले तंटे मिटविण्यासाठी त्यांच्याकडे घेऊन येत.

एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. एकदा गोहजवाले राणाजीशी संधान बांधून महादजी शिंदे यांनी इंग्रजास पळवून लावले. पुढच्याकाळात शिंदे गोहजवाल्यांच्या मागे लागले तेव्हा गोहजवाल्यांनी वकिलामार्फत आपली तक्रार अहिल्याबाईंकडे नेली. त्यावेळी आपल्या दिवाणाला शिंदे यांना पत्र लिहिण्यास सांगितले आणि त्यात लिहिले, 'सर्वांशीस आपण वाईट झाल्यास पुढे आपले कसे होईल? तेव्हा सलोखा राहून पुढील काम करा.'

अशा तऱ्हेने तिच्याकडे येणाऱ्या सर्व तक्रारींची ती व्यवस्था लावत असे. तिचा शब्द सहसा कोणी खाली पडू देत नसे. कारण त्यांना नैतिक आचरणाचे अधिष्ठान होते. प्रत्यक्ष पुणे दरबारालाही एक दोनदा तिच्या निर्णयाला मान द्यावा लागला. नाना फडणीसांना एकदा काही व्यापाऱ्यांची शंका आली आणि त्याने त्यांच्या जमाखर्चाच्या वह्या तपासण्याचा हुकूम दिला. व्यापारी अहिल्याबाईंकडे गेले. त्यावर बाईंनी नानांची समजूत घातली व नानांनी या प्रकरणात माघार घेतली.

दुसरा प्रसंग तिच्या निर्लोभी स्वभावाविषयीचा आहे. खरगोण गावात तापीदास आणि बनारसदास या नावाचे दोन बंधु सधन पेढीवाले होते. ते दोघेही निपुत्रिक मरण पावले. त्यांच्याजवळ जवळपास चार लाखांची पुंजी होती. तापीदासच्या बायकोला ही सर्व संपत्ती अहिल्याबाईंना अर्पण करण्याची इच्छा होती. तिने वकिलामार्फत तसे कळवले. त्यावर अहिल्याबाईनी तिचे म्हणणे नाकारले व कळवले की 'ही संपत्ती तू दान धर्मात खर्च कर वा लोकोपयोगी कामे करण्यात खर्च कर त्याने तुझ्या नवऱ्याचे नाव मागे राहील.' तापीदासच्या बायकोनेही गोष्ट मान्य करून अहिल्याबाईंचे आभार मानले.

अहिल्याबाईचे खाजगी जीवन आदर्शवत होते. तिची दिनचर्या ठरलेली असे. सूर्योदयापूर्वी एक तास उठून स्नान उरकून ती पूजाअर्चा

पूर्ण करीत असे. नंतर नियमित पुराण श्रवण करीत असे. आणि दान देण्याचा आणि आपल्या समक्ष ब्राह्मणांना भोजन घालण्याचा कार्यक्रम उरकला जाई. इतके झाल्यावर तिचे जेवणाचे ताट येई. जेवणात सात्विक पदार्थ असत. मांसान्नाचा तिने त्याग केला होता. भोजन झाल्यावर पोशाख करू दुपारच्या सुमारास दरबारात जात असे. तिचे बहुतेक संध्याकाळी सहापर्यंत काम आटपे. पुढे दोन तीन तास परत पूजाअर्चा आणि फराळ करण्यात जाई. साधारण नऊ वाजण्याच्या सुमारास ती पुन्हा सरकारी काम पहावयास लागे आणि ते काम अकरा वाजेपर्यंत पहात असे आणि मग अकरा वाजून गेल्यानंतर निजावयास जात असे या दिनक्रमात उपवासाचे दिवस, सणावाराचे कार्यक्रम आणि महत्त्वाच्या सरकारी कामकाजाचे दिवस या खेरीज बदल होत नसे.

पत्रलेखनही कला आहे हे आता मान्य झाले आहे, जुन्याकाळीसुद्धा असावे. विशेषतः राज्यकारभारात राजकीय मुत्सद्यांना पत्र लिहिणे हे एक अतिशय अवघड काम असायचे. परंतु अहिल्याबाईसारखी बुद्धीमान स्त्री त्या कामातही कसबी होत्या, हे त्यांचा पत्रव्यवहार पाहता लक्षात येते. त्यांच्या पत्रात नेमका मजकूर आवश्यक तेवढी वाक्ये, परखड भाषा, पाल्हाळ न लावता मूळ विषयाची थेट व सविस्तर चर्चा; राज्यकारभाराच्या दृष्टीकोनातून केलेल्या मार्मिक सूचना या गोष्टी ठळक असायच्या. त्याचप्रमाणे सूचना करताना प्रसंगी पौराणिक, धार्मिक व ऐतिहासिक गोष्टीचे दाखले, नर्म विनोदी छोटी छोटी परंतु मनखेचक वाक्ये व नेमकी शब्दरचना त्या जागोजाग करीत. त्यातून त्यांच्या राजकीय परिपक्व बुद्धीचे जसे दर्शन घडते तसेच त्यांचा चाणाक्षपणा हजरजबाबीपणा हा सुद्धा कळून येतो. त्याची या संदर्भात महेश्वराची बातमीपत्रे आणि होळकरांची कैफियत यामधील पत्रे अभ्यास करण्याजोगी आहेत. ही पत्रे त्यांनी तुकोजी होळकर, महादजी शिंदे, नाना फडणीस, राघोबादादा, श्रीमंत माधवराव पेशवे आदींना प्रसंगावत लिहिली आहेत.

त्यातून त्यांच्या तल्लख बुद्धीचे विलोभनीय असे दर्शन घडते.

सन १७६७ ते १७९५ पर्यंत अशी अठ्ठावीस वर्षे इंदूरच्या संस्थानाचा उत्तम कारभार करून अहिल्याबाईने प्रजेचा कमालीचा विश्वास प्राप्त केला आणि त्याला कारण होतं तिचा प्रजेविषयीचा एकनिष्टपणा. प्रजेचं सुख ते आपलं सुख मानून तिनं राज्य कारभार केला. प्रजेच्या सुखासाठी, आनंदासाठी काम करायचं हे तिच्या प्रदीर्घ यशस्वी कारकीर्दीचं धोरण, ध्येय व सूत्र राहील होतं. तिने तिच्या प्रजेसाठी केलेल्या अनंत लोकोपयोगी कामांमुळे आणि दानधर्म करण्याच्या वृत्तीमुळे तिला पुण्यश्लोक ही मानाची पदवी मिळाली. विशेष म्हणजे ही पदवी तिला प्रजेनं आपणहून बहाल केली होती, ती कुठल्या शासन यंत्रणेकडून मिळाली नव्हती.

तिच्या अठ्ठावीस वर्षाच्या कारकीर्दीविषयी तत्कालीन भारताचा गव्हर्नर माल्कम साहेब म्हणतो, ते खूप महत्त्वाचे आहे. तो लिहितो, आपल्या प्रजेला व हाताखालच्या लोकांना सुख लाभेल याशिवाय अन्य विचारांना अहिल्याबाईनं मनात थारा दिला नाही. अनियंत्रित अधिकाराचा उपयोग तिने काळजीपूर्वक दक्षतेनं केला. नम्र वृत्ती कायम ठेवून तिनं सद्सद्विवेक बुद्धीला पटणारे आदेशच तेवढे पाळले. तिचं स्वतःचं चारित्र्य खूप कठोर शिस्तीतलं असलं तरी दुसऱ्यांच्या दोषांबद्दल व दुर्बलतेबद्दल तिच्या मनात नेहमी क्षमा असे.'

अहिल्याबाईंनी आपला राज्यकारभार एवढ्या चातुर्याने व सक्षमतेने केला त्यामुळे ती एका परकीय अधिकाऱ्याच्या प्रशंसेस पात्र ठरली.

■

७. राज्यात केलेल्या सुधारणा

राज्यकारभार सुरू केल्यानंतर आणि एकूण राज्यव्यवस्थेवर पकड निर्माण झाल्यानंतर अहिल्याबाईने राज्यात अनेक सुधारणा केल्या, तसेच अभिनव कल्पना राबवल्या.

पहिले तिने काय केले असेल तर ते म्हणजे कायद्यात सुधारणा. मल्हारराव होळकरांनी बनवलेल्या कायद्यात तिने काळाप्रमाणे बदल केले आणि त्यात अचूक व योग्य सुधारणा केल्या. पूर्वीप्रमाणे चालत आलेली पाटील, कुलकर्णी ही वतने तिने कायम ठेवली. लोकांना त्वरित व योग्य न्याय मिळावा म्हणून न्यायपद्धती अतिशय सोयी व सुटसुटीत बनवली. कायदे मोडणाऱ्यांस तसेच अन्याय करणाऱ्यास तिने कडक शिक्षा सुरू केली आणि त्यांची अंमलबजावणी होते की नाही हे ती स्वतः पाही. त्यासाठी नगरात राज्यात फिरू त्याची खातरजमा करीत असे. या पद्धतीमुळे कायदा मोडणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आणि प्रजेमध्ये एक धाक, वचक निर्माण झाला. गावागावात होणारी छोटी भांडणे, आपापसातील तंटे मिटविण्यास तिने सक्षम अशी माणसे नेमली, ती म्हणजे पंचाधिकारी. या मंडळींच्या न्यायकृतींवर तिची करडी नजर असे. त्यामुळे निर्णय देताना पंचाधिकारी काळजी घेत आणि योग्य

निर्णय देत. या पंचाधिकाऱ्यांना भीती असे की, निर्णय चुकला तर बाईंकडे तक्रार जाईल आणि त्या हयगय करणार नाहीत त्यामुळे गावच्या या न्यायदानात कुचराई होत नव्हती.

जनतेच्या तक्रारी वा अडचणी याबाबत आणखी एक गोष्ट होती. सर्व सामान्यजन अहिल्याबाईंना थेट भेटू शकत. त्याचे एक उदाहरण बोलके आहे. एकदा वाड्याबाहेर तिला आरडाओरडा ऐकू आला. तुकोजीस विचारता त्याने सांगितले की, एका बाईला संतान नाही तेव्हा तिने दत्तक घेण्याची परवानगी मागितली. तेव्हा दरबारातील अधिकाऱ्याने एक लाखाची लाच मागितली. तिच्या या तक्रारीची बाईनी जातीने दखल घेतली. ती रागाने तुकोजीस म्हणाली, 'काय म्हणता त्या विधवेला एका महिन्यातही न्या मिळू नये? बोलवा त्या अधिकाऱ्यास' तिने त्या अधिकाऱ्यास २ लाख रु. भरण्याचा दंड केला आणि पंचवीस फटक्यांची शिक्षा केली. आणि त्या बाईला म्हटलं, दत्तक घेण्याची तयारी करा. त्या दत्तक पुत्राला आम्ही आमच्यातर्फे नजराणा देऊ.'

तुकोजीने दुसऱ्या दिवशी शिक्षेची अंमलबजावणी केली आणि अधिकाऱ्यास शिक्षा मिळाली. या गोष्टीचा वचक इतर नोकरदारांवर बसला.

अहिल्याबाईंसारखा न्यायाधीश पुन्हा होणे मुश्किल आहे हे सर जॉन माल्कम याने तिच्या न्यायपद्धती संबंधी काढलेले उद्गार अगदी सार्थ होते.

अहिल्याबाईने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आणि ते होते कर पद्धतीबाबत. अगोदरची करपद्धत खूप किचकट होती म्हणून त्यामध्ये आमुलाग्र सुधारणा केली. तिची करपद्धत आर्य चाणकाच्या करपद्धतीवर आधारित होती. तिने आपल्या दरबारी मंडळींना असे पटवून दिले की, कर देताना प्रजाजनांना त्रास होऊ नये. आणि त्यांना तो सुखासमाधानाने देता आला पाहिजे. तिने शेतकऱ्यांच्या शेतसाऱ्यामध्ये

काही बदल केले. त्यात शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आधारित शेतसारा भरण्याची सोय झाली. अशा सुधारणांमुळे तिचे राज्य आदर्श ठरले यात नवल नव्हते.

आज आपण एकविसाव्या शतकात पर्यावरणाविषयी खूप जोमाने चर्चा, विचार करताना दिसतो. सरकारी पातळीवर आज अनेक प्रयत्न होताना दिसतात. याचा प्रारंभ छ. शिवाजी महाराज यांच्या राजवटीपासून झालेला आहे आणि त्यांचाच कित्ता अहिल्याबाई होळकर या आदर्श राज्यकर्तीने आपल्या राज्यात राबवला होता. अहिल्याबाईने अडीचशे वर्षापूर्वी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून ते योग्य प्रमाणात राखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. आपल्या प्रजाजनानाही करावयास भाग पाडले. रस्त्याच्या दोन्ही बाजूना तसेच ओसाड पडीक व डोंगराळ जमिनीवर तिने लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदूंबर यांची भरपूर झाडे लावण्याची व्यवस्था केली. ही झाडे लावताना दोन बाबींकडे लक्ष दिले. एक म्हणजे त्या झाडांचे धार्मिक महत्त्व असलेले पाहिले, आणि त्या झाडांची मूळे जमिनीत खोलवर जाऊन वातावरणात नैसर्गिक गारवा कसा टिकेल याकडे पाहिले. आजच्या अभयारण्याच्या कल्पनेचे हे कदाचित उगमस्थान असावे. दुसरा एक नियम केला. प्रत्येक शेतकऱ्याने २० झाडे लावलीच पाहिजेत असा दंडक जारी केला आणि त्यांची विभागणी केली. त्यातील ११ झाडे सरकारी तर ९ झाडे शेतकऱ्यांची होती संबंधित शेतकऱ्यांना त्या झाडांपासून मिळणारे लाकूड वापरण्याची परवानगी देण्यात आली. जनतेच्या पाण्याच्या गरजेसाठी ठिकठिकाणी तलाव आणि विहीरी बांधून दिल्या आणि त्यातून जनतेला पाण्याची सुबत्ता प्राप्त झाली. नदीचे वाहते पाणी प्रदूषणाने दूषित होते हे सर्वश्रूत आहे. त्यासाठी तिने एक शक्कल रूढवली. नदीच्या मूळ प्रवाहापासून एक प्रवाह वळवून वेगळा केला आणि ते पाणी प्रजाननांनी अंघोळी, कपडे धुणे, जनावरांना धुणे यासाठी वापरावे असा दंडक घातला. आणि हेच पाणी पुढे नेऊन शेतीस

देण्याची उत्तम सुविधा करून दिली. यामुळे पाणी प्रदूषित होण्याची समस्या टळली आणि त्याचा परिणाम असा झाला की निर्माण झालेली शेती- धान्य भरपूर, सकस व उत्तम मिळू लागले. एका दूरदृष्टीच्या विचाराने तिने वनीकरण, जलसंवर्धन, जलवितरण यासाठी स्वतंत्रखाते आपल्या राज्यात निर्माण केले होते. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची नाहक हत्या करणे हा विचार समाजात पटवून देण्यात ती यशस्वी झाली. याशिवाय पशु, पक्षी, मासे या जीवांची सुद्धा तिने काळजी घेतली होती.

तिचे सासरे पराक्रमी मल्हारराव होळकरांनी त्यांच्या हयातीत अनेक गावे जिंकून घेतली होती. दूरदूर पसरलेल्या गावांचा, परगण्यांचा महसूल गोळा करावा ही एक मोठी डोकेदुखी तिच्या कारभाऱ्यांपुढे होती. त्यासाठी अहिल्याबाईने राज्याचे लहान गावे, मोठी गावे, परगणा, महाल, सुभा असे भाग पाडले. आणि राज्याचा महसूल गोळा होण्याला हे खूप सोईचे झाले. प्रत्येक गावी तिने कार्यकुशल प्रामाणिक आणि सक्षम अशा अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. त्यांच्या सुभ्याचे नाव इंदूर होते. आणि महालामध्ये स्वदेश, खानदेश नेमाड, माळवा, हाडोळी, जातवडा, बुंदेलखेड, घुंदाड, नरवर, अंतर्वेद, मेवाड यांचा समावेश होता. अहिल्याबाईने अशी व्यवस्था केली होती की प्रत्येक गावात घडलेल्या छोट्या-मोठ्या गोष्टी घटना, एखादा तंटा याविषयीची खडान खडा माहिती तोंडी तसेच लेखी स्वरूपात त्यांच्यापर्यंत पोचावी. यामधून राज्यात घडणाऱ्या छोट्यामोठ्या बाबींची खबर तिच्यापर्यंत पोचत होती. यामध्ये राज्यकर्त्यांने आपल्या राज्यातील प्रत्येक घटनांबाबत अवगत असणे हा भाग होता. तसेच तंटा बखेडा असेल तर त्यात हस्तक्षेप करून ती काही उपायही सूचवू शकत होती. तिचे वैयक्तिक आयुष्य एवढे सुखकारक नव्हते अनेक दुःखदायक घटनांनी ती सतत त्रासून गेलेली असायची. असे, असतानाही राज्यकारभारात ती आपले दुःख आणित

नव्हती, उदासीनताही आणत नव्हती. राज्यात प्रजेसाठी काहीना काही कामे चालू असायची. प्रजा सुखी तर राज्यकर्ते सुखी आणि प्रजेचं हित ही ईश्वरसेवा हे तिचे ब्रीद होते आणि तिने ते आयुष्यभर जपले. याच दृष्टीकोनातून प्रजेच्या सुखासाठी तिने चाळीस ठिकाणी दानधर्माची व्यवस्था केली होती आणि त्यासाठी तिने व्यक्तिगत खजिना रिकामा केला. यातून तिचे प्रजाहितकर्ती व आदर्श राज्यकर्ती हे रूप दिसून येते.

अहिल्याबाईंच्या राज्यकारभारातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भिल्ल, गोंड, रामोशी इत्यादी गुन्हेगार जमातींचा अतिशय कुशलतेने व मानवतेच्या दृष्टीकोनातून तिने केलेला बंदोबस्त ही होय.

या जमाती सर्वच राज्यकर्त्यांना डोकेदुखी असतात. परंतु अहिल्याबाईंनी बुद्धिकौशल्याने त्यांना मूळ समाजाशी एकरुप करून घेतले. या जमातीचे लोक रानावनात मोठा धुमाकूळ घालीत. एखाद दुसऱ्या असलेल्या प्रवाशांना लुटणे, वाटसरुंवर हल्ला करणे चोऱ्या करणे, इत्यादी प्रकार त्यांच्या नित्यक्रमात असायचे. आपल्या प्रजेचे या लोकांपासून संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून अहिल्याबाईंनी या कामास सुरुवात केली. नुसत्या पराक्रमाने वा त्यांच्या धरपकडीने त्यांचा कायमचा बंदोबस्त होणे शक्य नाही हे त्या चाणाक्ष राज्यकर्तीने ओळखले. राज्यावर येताच अहिल्याबाईंनी त्या जमातीच्या प्रमुखास दरबारात बोलावले. त्याला त्यांच्या उदरनिर्वाहाची एक अभिनय योजना समजावून सांगितली. ती योजना अशी होती– तिने जागोजाग अनेक चौक्या बसविल्या. त्या भागातून जाणाऱ्या येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून तसेच प्रवाशांकडून योग्य तो कर वसूल करण्याचा अधिकार त्या जमातीला दिला. या कराला ‘भिलकवाडी’ असे नाव देण्यात आले. शिवाय आजूबाजूला असलेल्या अनेक पडीक ओसाड जमिनी तिने या लोकांच्या हवाली केल्या. पडीक जमिनी वृक्षारोपनासाठी दिल्या तर चांगल्या जमिनी शेती करण्यासाठी दिल्या. मात्र त्यांना एक ताकीद सुद्धा दिली

जर आजूबाजूला कुठे चोरी वा गुन्हेगारीसारखे प्रकार घडले तर त्यांचा तपास त्यांनी लावून दिला पाहिजे. याचा इष्ट तो परिणाम झाला. राज्यातील लोकांचे वर्तन सुधारले व गुन्हेगारी कमी झाली, समाजात शांतता नांदू लागली. समाजात तिला मानाचे स्थान मिळाले. खरं म्हणजे एका अर्थी चोराच्या हाती घरच्या तिजोरीच्या किल्ल्या देण्याचा हा प्रकार होता, एक प्रकारे जुगार होता. पण आपल्या असामान्य बुद्धीसामर्थ्यावर व मानवी मन समजून घेण्याच्या बळावर त्या या प्रयोगात यशस्वी झाल्या. परिणामी गुन्हेगार जमातीच्या लोकांचे वर्तन सुधारले. ते अहिल्याबाईंना देवी मानू लागले, तिच्या प्रत्येक शब्दाला मान देऊ लागले.

प्रजेच्या दौलतीचा तिने लोभ केला नाही तसेच राज्यात कलाकारांना मान दिला, याची दोन उदाहरणे आहेत. एकदा राज्यात एका सावकाराचे निधन झाले. त्याच्या बायकोने एक दिवस अर्ज केला की, माझी दौलत खूप असून त्याचा वारस करण्यासाठी मला दत्तक घेण्याची परवानगी मिळावी. अहिल्या-बाईंच्या चार कारभाऱ्यांचे म्हणणे पडले की बाईला दत्तकाची परवानगी द्यावी. परंतु नजरेचा ठराव करून घ्यावा, कारण सावकाराची संपत्ती अमाप आहे. त्या बोलण्यावर अहिल्याबाई म्हणाली, दत्तकाची परवानगी द्यावी असे मला वाटते. परंतु नजरेची रक्कम कशाकरिता घ्यायची? तिच्या नवऱ्याने मेहनत करून द्रव्य कमविले आहे. शास्त्राप्रमाणे पुत्र दत्तक घेण्याची तिला अधिकार आहेच. तिला परवानगी देताना तिच्याकडून नजररूप दंड घेतला जातो तो ती देईल पण ते द्रव्य चोरीचे झाले वा जबरदस्तीने घेतल्यासारखे होईल असे सांगून तिने त्या स्त्रीला कळविण्यास सांगितले की, तुम्ही दत्तक घेण्यास आमची काही हरकत नाही. तुम्ही तुमचे लौकिक सांभाळून वर्तन करावे. तुमच्या द्रव्याचे तुम्ही मालक तेव्हा आम्ही तुम्हापासून विनाकारण काही नजर घेणार नाही.'

दुसरा प्रसंग एका कलाकाराचा. अनंत फंदी घोलप नावाचा एक शाहीर संगमनेरी राहत होता उत्तान शृंगारात्मक लावण्यांनी त्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले होते. होळकरांच्या राज्यात जाऊन आपली कला दाखवावी म्हणून तो ताफ्यासह होळकरशाहीत अहिल्याबाईंकडे निघाला. महेश्वरकडे येताना वाटेत सातपुडा पर्वत लागला तिथे भिल्लांचा मोठा उपद्रव होता. अनुयायांसह प्रवास करताना अनंतफंदीला भिल्लांच्या एका टोळीने गाठले. त्याच्यांकडील सर्व चीजवस्तु हिरावून घेतल्या. प्राणावर बेतले आहे असे पाहून अनंतफंदीला एक युक्ती सूचली. त्याने भिल्ल जमातीवर एक पोवाडा शीघ्रपणे रचला व सुरेल आवाजात त्यांच्यापुढे सादर केला. सगळे भिल्ल खूष झाले. त्यांनी लुटलेला माल परत केला आणि वर बुवांना वस्त्रे व पैसे दिले. विचारपूस करताना जेव्हा भिल्लांना कळले की, ते सर्वजण अहिल्याबाईंकडे जात आहेत तेव्हा तर आपण केलेल्या दृष्कृत्याबद्दल त्यांना वाईट वाटते. वाटेत अनंत फंदीना काही त्रास होऊ नये म्हणून त्यांनी पाच माणसे बरोबर दिली.

अनंत फंदी महेश्वरात पोचले. तिथे अहिल्याबाईं समोर त्यांचा फड झाला. खेळ झाल्यावर अहिल्याबाई बुवांना म्हणाल्या, तुम्ही ब्राह्मण असून अशा कर्मात कवित्वबुद्धी खर्च करीत आहात, त्यापेक्षा परमार्थ साधणारी रचना कराल तर आपल्याबरोबर अन्य जनांचे हित साधाल. या उपदेशाने अनंतफंदींनी वृत्ती बदलली त्याने आपला डफ फोडला आणि बिदागी न घेता मंडळी संगमनेरी आली.

पुढे एकदा संगमनेरच्या उत्सवप्रसंगी अनंत फंदीला खूप आग्रह झाला. फड जमवून त्याने तमाशा सुरू केला. त्याचवेळी अहिल्याबाई पुण्यात चालल्या होत्या. संगमनेरी बरीच गर्दी दिसली म्हणून त्यांनी चौकशी केली तेव्हा अनंत फंदी तमाशा करीत असल्याचे समजले. अनंत फंदीला चांगली शिक्षा करावी या हेतूने त्या तमाशाच्या जागी आल्या. अनंत फंदीला याची कुणकुण लागता तो मनात शरमला. त्याने

समयसूचकतेनं नर्तकाला बाजूला सारले एक टाळकरी उभा केला आणि खड्या आवाजात कीर्तनाला सुरुवात केली. 'हरी तुझी मुरली घर वेणी' हे रागदारीतले पद ऐकून बाई खूष झाल्या. सर्व श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले. अहिल्याबाईंनाही खूप आनंद झाला. त्यांनी अनंतफंदीला पोषाख व सोन्याची कडी इनाम दिली. त्या दिवसापासून अनंतफंदीने डफ टाकला आणि आमरण कीर्तनसेवा केली.

म. म. दत्तो वामन पोतदार अहिल्याबाईंच्या राज्य कारभाराविषयी म्हणतात, 'मल्हारराव होळकरांच्या पश्चात सर्व कारभाराचा बोजा अहिल्या-बाईंवर पडला. सुमारे ३० वर्षे तो तिने उत्कृष्टपणे सांभाळला आणि आपले नाव सर्वतोमुखी केले..तिच्या कर्तृत्वाच्या अजरामर साक्षी थेट काश्मीर नेपाळपासून तो रामेश्वरपर्यंत व सोरटी सोमनाथ पासून तो काशी विश्वेश्वरापर्यंत हिंदुस्थानच्या चारही दिशांत अद्यापही उभ्या आहेत... आज तिच्या पुण्याईचा वाटा घरबसल्या एकंदर मराठ्यांच्या किर्ती वैभवास कारणीभूत होत आहे. तिने आपला सर्वांचा माथा उजळ केला आहे... तिचे हिंदुस्थानवर झालेले उपकार विसरण्याजोगे नाहीत.'

अहिल्याबाईंने आपल्या राज्यात केलेल्या सुधारणा पाहता कुणालाही महामहोपाध्यांचे हे गौरवोद्‌गार योग्य वाटतील यात शंका नाही.

■

८. अहिल्याबाईंची लोकोत्तर कामे

सरदार मल्हारराव होळकर हयात असेपर्यंत इंदूर संस्थानची राजधानी इंदूर या ठिकाणी होती. मल्हाररावांच्या पश्चात राज्यकारभार हाती घेतल्यानंतर काही काळातच अहिल्याबाईंने राजधानीचे ठिकाण बदलले. नर्मदा नदीकाठी महेश्वर नावाचे सुंदर ठिकाण इंदूरपासून एकवीस मैलांवर बसले होते. त्या ठिकाणी तिने राजधानी आणली. नर्मदा नदीकाठी भव्य दिमाखदार व मजबूत किल्ला बांधून घेतला. आणि त्या जागी आपले निवासस्थान नेले. पुढे हळूहळू लहान मोठे उद्योग महेश्वरास सुरू झाले. त्यात साड्या, धोतरे, पैठण्या यांचे उत्पादन सुरू केले. एकूणच या व्यवसायाची भरभराट झाली आणि सर्व हिंदुस्थानभर महेश्वरी साड्या, धोतरे व पैठण्या यांचे नाव ख्यातकीर्त झाले.

राज्यकर्त्यांनी आपल्या प्रजाजनांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यायला हवे, त्यांच्या गुणांची कलेची जोपासना व्हायला हवी याकडे त्यांनी प्रारंभापासून लक्ष दिले आणि त्यादृष्टीने त्या सतत प्रयत्नशील राहिल्या. लहानपणापासून त्या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. विविध ग्रंथ पोथ्या विशेषतः महाभारत-रामायण आदी ग्रंथ, पुराणे वाचण्याचा तसेच श्रवण करण्याचा त्यांना नाद होता. त्याचाच एक भाग म्हणून आणि प्रजेची

उत्तम वाचनाची सोय व्हावी म्हणून त्यांनी आपल्या या नवीन राजधानीत उत्तम ग्रंथानी परिपूर्ण असे एक चांगले ग्रंथालय बांधून घेतले. या ग्रंथालयात उत्तमोत्तम ग्रंथाचां साठा केला जाईल हे जातीने पाहिले. या ग्रंथालयासाठी प्रसिद्ध ग्रंथाच्या हस्तलिखित पोथ्या करवून घेण्याचे महत्त्वाचे काम केले. त्यात रामायण, महाभारत, भागवत, गीत गोविंद, ज्ञानेश्वरी, रस मंजिरी रघुवंश, विष्णु सहस्रनाम, व्यंकटेशस्तोत्र, दानचंद्रिका, पूजा प्रकार निर्णय सिंधू, मुहूर्त चिंतामणी आदी ग्रंथ होते. त्याचबरोबर त्यांनी हे ग्रंथालय संपन्न व्हावे म्हणून १७६८ मध्ये चांदवडाहून २४ दुर्मिळ ग्रंथ मागवून त्यांचा ग्रंथालयात समावेश करू घेतला. या सगळ्या गोष्टी पाहता अहिल्याबाईचे ग्रंथाविषयी प्रेम आणि सतत ज्ञान मिळविण्याची इच्छा किती प्रबळ होती हे ध्यानात येते.

अहिल्याबाईंच्या राज्यात प्रजासुखी होती. समाधानी होती आणि याचे ठळक कारण होते तिने उत्तम प्रकारे राबवलेली कायदा, न्यायदान आणि भरावे लागणारे कर यांच्या सुटसुटीत पद्धती हे आहे. तिचा प्रजेच्या प्रती दृष्टिकोन मानवतावादी होता. त्यामुळे ती हिवाळ्यात गोर गरीब प्रजाजनांना घोंगड्या, रग, वूलनचे कपडे देत असे तर उन्हाळ्यात सुती, कपड्याचे वाटप करी. प्रवाशांच्या सुखसोयीसाठी तिने राज्यात जागोजागी पाणपोयी बांधून घेतल्या होत्या आणि शेतकरी जेव्हा शेतात मेहनतीने कामे करीत तेव्हा त्यांना व त्यांच्या जनावरांसाठी पाणी देण्याची तिने स्वतंत्र व्यवस्था केली होती. कुणीही गरीब माणूस अन्नाशिवाय राहू नये या दयाभावनेने त्यांच्यासाठी अन्नछत्रे उभारली होती आणि त्यांच्या निवाऱ्यासाठी जागोजागी धर्मशाळा बांधून ठेवल्या होत्या.

दानधर्म करणे हा तर त्यांचा स्थायीभाव होता. या भावनेतून तिने दानधर्माचे सोळा प्रकार नेमून देऊन त्याची अंमलबजावणी केली होती. ते प्रकार असे होते– धर्मशाळा बांधणे, मंदिरांचा जार्णोद्धार, पूजा व्यवस्था, पाण्याच्या सोयीसाठी कुंडाची निर्मिती, तलाव व विहिरींची खोदाई,

घाटांची निर्मिती, नंदादीप, रस्ते बांधणे, गंगेची कावड, सभामंडप उभारणे आदी बाबींचा समावेश प्रामुख्याने केला होता. तिने स्पष्ट केलेल्या या सर्व प्रकारांचा एकच अर्थ होता आणि तो म्हणजे राज्यकर्त्यांनी आपले देव देव्हाऱ्यात पाहू नये तर त्यांचे देव रस्त्यात उघड्यावर असतात. रस्त्यावरील प्रजेची काळजी केली तर त्यांना देवाचे आशीर्वाद नक्की मिळतात. अशा गोष्टींमधून त्यांनी राज्यकर्त्यांना विशेषतः कारभाऱ्यांना दिलेला जो संदेश दिला तो खूप मोलाचा आहे.

तिच्या कल्याणकारी राज्यकाराभाराविषयी इतिहासकारांनी खूप प्रशंसनीय उद्‌गार काढले आहेत; ते असे आहेत 'हिंदुस्थानात आजूबाजूला युद्धे, अशांतता यांचे वारे वाटत असताना अहिल्याबाईच्या राज्यात मात्र शांतता व सुव्यवस्था होती. विद्वान संतुष्ट होते, कलावंत आनंदात होते. प्रजेला न्याय मिळत होता. कोणताही अधिकारी जुलूम जबरदस्ती करीत नव्हता. परिणामी शांततेचे वातावरण असल्याने व्यापार उद्योग उत्तम प्रकारे सुरू होता. तिची गंगाजळी नित्य भरलेली असे. जगा व जगू द्या ही राजनीति असल्याने उत्पन्नात दरवर्षी एक कोटी साठ लक्ष, तीस सहस्र दोनशे चोवीस रुपये सात आणे नऊ पैची भर पडत होती.

मल्हाररावांनी खाजगी म्हणून शिल्लक टाकलेल्या पंधरा-सोळा कोटी रुपयांच्या शिलकेतून परोपकारासाठी व दानधर्मासाठी अहिल्याबाईनी प्रचंड खर्च केला आणि त्यामुळेच तिचे नाव चिरस्थायी झाले. किल्ले, घाट, देवळे, धर्मशाळा, तळी, अन्नछत्रे बांधण्यात तिने पाण्यासारखा पैसा खर्च केला असे दिसते. त्यामुळे पूर्वेस जगन्नाथपुरी पासून पश्चिमेस द्वारकेपर्यंत आणि उत्तरेस बद्रिकेदारपासून दक्षिणेस रामेश्वरपर्यंत हिंदुस्थानात चारी बाजूना अहिल्याबाईंच्या नावाचा उद्‌घोष अनेक वर्षांनंतर ऐकू येताना दिसतो. याचे एक कारण हेच आहे की, बहुतेक सर्व प्रसिद्ध ठिकाणी काही ना काही परोपकारी कामे अहिल्याबाईने करून ठेवली आहेत. काशी, प्रयाग, गया, हरिद्वार, अयोध्या रामेश्वर इत्यादी ठिकाणी

तिने बांधून घेतलेले घाट व मंदिरे भारताच्या कीर्तित निश्चित भर घालणारी ठरली आहेत. त्याचप्रमाणे अहिल्याबाईने काशी विश्वेश्वराचे मंदिर व गया येथील विष्णुपदाचे मंदिर पुन्हा नव्याने बांधले आणि कलकत्त्यापासून काशीपर्यंत भला थोरला रस्ता बांधला हेही काम कौतुकास्पद आहे.

हिंदुस्थानातील मुख्य मुख्य तीर्थांच्या ठिकाणी असलेली अन्नसत्रादि व्यवस्था चालविण्यासाठी दरवर्षी खर्च होई. त्या खेरीज लहान सहान तीर्थांच्या ठिकाणीही स्थळांच्या मानाने पैसा देण्याची व्यवस्था केली जात असे. या नियमित धर्मदानाखेरीज अहिल्याबाई आणखीही धर्म काम करीत असे. दक्षिण हिंदुस्थानात निरनिराळ्या ठिकाणच्या देवळात अभिषेकाकरिता नित्य भागीरथीचे उदक ती पाठवीत असे यातून तिला मिळालेला लौकिक त्याचे मोल काही वेगळे होते, जे इतर कुठल्याही गोष्टीने येणार नव्हते. तिचा आपल्या धर्माविषयी निष्कपट भाव होता आणि देवाची पूजा अर्चा करून कृपा संपादन करावी आणि त्यापासून आपले व आपल्या देशाचे कल्याण व्हावे अशी तिची मनोमन धारणा होती. या धारणेमुळेच बहुधा हिंदुस्थानच्या विस्तीर्ण भागावर पसरलेली तिची दानकृत्ये निर्माण झाली असावी.

तिच्या एकूण दानधर्मात आणि अन्नसत्रांच्या व्यवस्थेमध्ये भूत भक्तीचा असा एक अंकूर दिसून येतो की त्यास खऱ्या शहाणपणाचे व लोकोपकाराचे स्वरूप प्राप्त होते. तिच्या परिपाठाप्रमाणे ती नित्यनेमाने दररोज गरीब लोकांना अन्न देई आणि विशेष सणावारांचे दिवशी अत्यंत कनिष्ट लोकांनासुद्धा मेजवानी मिळत असे. उन्हाळ्यामध्ये रस्तोरस्ती वाटसरूंना पिण्याचे पाणी देण्याकरिता नोकर उभे असत. थंडीच्या प्रारंभी बहुतेक आश्रितांस व पंगू झालेल्या माणसांना वस्त्रपावरणे मिळण्याची ती व्यवस्था करीत असे. तसेच त्यांच्याकरिता खाणे पाठवले जाई. उन्हाळ्याच्या दिवसात महेश्वरजवळचे शेतकरी असे पाहात की

जमीन नांगरली जात असता अहिल्याबाईचे नोकर पाण्याची भांडी घेऊन येत आणि नांगर थांबवून बैलांना पाणी पाजले जाई. रानातील पशु, पक्षी, नदीतील मासे हे सुद्धा तिच्या दयेचा अनुभव घेत. त्यांच्यासाठी खाणे पाठवले जाई. ही सगळी कामे अहिल्याबाई प्रजेच्या ठायी व प्राणीमात्रांच्या तिच्या असलेल्या माया-ममतेमधून करी.

अहिल्याबाईंच्या स्वभावात नैतिकबळ, तडफ, बाणेदारपणा, सचोटी, प्रजा प्रेम, न्याय निष्ठुरता, समजंसपणा, सहृयता, संकटाना सामोरी जाण्याचा करारीपणा आदी गुण एकवटलेले होते. त्यामुळे इंदूर संस्थानाचा चोख कारभार तिने केला. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत राज्यकारभार एवढा दक्षतेने व चातुर्याने केला की, तिची हुशारी, चांगुलपणा आणि शहाणपणाबद्दल तिच्या नावाचा डंका हिंदुस्थानभर गाजला आणि तिचे नाव देशात एक आदर्श राज्यकर्ती म्हणून अजरामर झाले.

■

९. आप्तांच्या मृत्यूमालिका व शेवट

अहिल्याबाईने आपल्यावर सोपवल्या गेलेल्या इंदूर संस्थानचा आणि दौलतीचा कारभार अतिशय कौशल्याने व प्रामाणिकपणे केला. त्याला कारणीभूत होते तिचे पराक्रमी सासरे मल्हारराव होळकर. त्यांनी तिला राज्यकारभाराचे प्राथमिक धडे दिले. पुढे तिने स्वतःच्या हुषारीने गोष्टी आत्मसात केल्या आणि उत्तम कारभाराचा आदर्श निर्माण केला. मात्र हे करीत असताना तिला प्रापंचिक सुख जसे लाभले नाही, तसेच खूप आनंदक्षणही मिळाले नाहीत. उलट अनेक संकटे आली आणि जवळच्या आप्ताचे मृत्यू पहावया लागल्याची दुःखे मनाला घर करीत राहिली. नियतीने तिच्या आप्तांच्या मृत्यूमालिकांचं भीषण ताट कसं वाढून ठेवलेलं होतं त्याची हकीगत खूप हृदय पिळवटून टाकणारी आहे. एखादी बाई आप्तस्वकीयांच्या मृत्यूंच्या दारुण दुःखामुळे पूर्णपणे कोलमडून गेली असती वा मनाने खचून गेली असती पण अहिल्याबाईंच्या बाबतीत ते घडलं नाही. ती स्थितप्रज्ञ राहिली. कदाचित तिच्या धार्मिक व अध्यात्मिक वृत्तीनं तिला तारलं असावं. तिच्या खाजगी व वैयक्तिक आयुष्यातला पेला दुःखानं काठोकाट भरलेला होता आणि ते दुःख निकटच्या आप्तांच्या एकापाठोपाठ घडलेल्या मृत्यूचे होते. तरी या

धैर्यवान बाईने दुःखाचे घोट शांतपणे पचवले, त्यांना सामोरी गेली.

पेशवे घराण्यावर तिची अमाप निष्टा होती. माधवराव पेशवे, नारायणराव पेशवे, माधवरावांच्या आई गोपिकाबाई व राघोबादारांची पत्नी आनंदीबाई यांचे मृत्यू तिला पहावे लागले. या दुःखानी ती काहीशी खिन्न झाली. पण ही मंडळी तिच्या रक्तामासाची नव्हती. त्यामुळे यथावकाश ती हे दुःख पचवू शकली आणि पुढे विसरू शकली. पण अगदी जवळच्या आप्तांच्या मृत्यूंचे काय? ती फार धीराची, सोशिक आणि स्थितप्रज्ञ होती त्यामुळे डोळ्यासमोर घडलेले आप्तांच्या मृत्यूचे हलाहल ती धैर्याने प्राशन करू शकली असावी. मात्र तिचं मन मोडून गेलं असेल यात शंका नाही. कदाचित तिच्या अध्यात्मिक वृत्तीमुळे हे अपरंपार दुःख सोसण्याचं बळ व सामर्थ्य तिला लाभलं असावं.

अहिल्याबाईचा नवरा खंडेराव आणि सासू गौतमाबाई व सासरे मल्हारराव होळकर तिच्या डोळ्यादेखत आधीच गेले होते. मुलगा मालेरावही अकाली गेला. त्याचे दुःख एवढे नव्हते कारण तो उचापती व उपद्रवी होता. त्यानंतर तिची कन्या मुक्ताबाई तिला जवळची अशी एकटी उरली होती. तिच्यावर अहिल्याबाईचं खूप प्रेम होतं. ती देखील आपल्या आईसारखी धार्मिक व सुस्वभावी होती. तिचा विवाह यशवंतराव फणसे यांच्याशी झाला होता. ते सरदार होते. मुक्ताबाई व यशवंतराव यांना एक मुलगा होता. त्याचं नाव होत धोंडीबा उर्फ नथोबा. मालेरावच्या मृत्यूनंतर या नातवाचा जन्म झालेला होता त्यामुळे अहिल्याबाईंचा तो अतिशय लाडका होता, त्यांच्या काळजाचा जणू तुकडा होता. आपल्या पश्चात या नातवाला होळकरांच्या गादीचा वारस करायचा अशी त्यांच्या मनची इच्छा होती. पण विधात्याची लीला काही वेगळीच असावी आणि याचा प्रत्यय तिला लवकरच मिळाला काही आप्तांच्या मृत्यूमालिकेने.

पहिल्यांदा अहिल्याबाईला दैवाने दोन तडाखे दिले. तिचे दोन

भाऊ शहाजी आणि महादजी शिंदे यांचे निधन अनु १७८४ आणि १७८६ साली झाले. एका पत्रात तिने आपला शोक व्यक्त केला. त्यातून तिचे शोकाकूल मन दिसते. त्यात ती म्हणाली, 'सारी मजदेखत गेली मीच काळतोंडी वाचले कशी!' पण ती धीराची बाई! त्या पत्रात पुढे तिने; तीन चार दिवस शोक केला आता दरबार भरवीत आहे. असे लिहून ठेवले आहे.

वरील पत्रातील मजकूराने सासरच्या व माहेरच्या नातेवाईकांच्या मृत्यूमुळे झालेल्या दुःखामुळे तिचे अंतःकरण कसे पोळत होते आणि तरीसुद्धा मनातले दुःख गिळून ती आपल्या कर्तव्याकडे कसे लक्ष देत होती हे समजून येते. एका आदर्श राज्यकर्तीला शोभणारे हे वर्तन होते.

या प्रसंगास पाच सहा वर्षे लोटली नाहीत तोच तिच्यावर आकाश कोसळल्यासारखे दोन प्रसंग आले. पहिला प्रसंग १७९० सालामधला आहे. मुलगा मालेरावाच्या मृत्यूनंतर आपले म्हणण्याजोगे तिच्या कुटुंबातील माणूस म्हणते तिची मुलगी मुक्ताबाई ही होती सरदार यशवंतराव फणसे यांची बायको, त्यांच्या मुलाचे नथोबाचे लग्न अहिल्याबाईनी मोठ्या थाटात इ. स. १७८० साली अक्षय तृतियेच्या दिवशी पार पडले. यावेळी त्याचे वय अवघे तेरा वर्षाचे होते. लाडामुळे असेल त्याला आणखी एक नवरी आणण्यात आली. काही वर्षे लोटली आणि नथोबा आजारी पडला. त्याचा आजार क्षयावर गेला आणि वयाच्या तेवीसाव्या वर्षी (१७९०) त्याचे निधन झाले. वयाच्या पासष्टीत पोचलेल्या अहिल्याबाईंना दुःखाचा आणखी एक झटका बसला.

नथोबाला दोन बायका होत्या, त्यांची वये होती अठरा व दहा वर्षे त्या तशा लहान होत्या पण धैर्य मोठे करू त्यावेळच्या रीतीप्रमाणे दोघींनी नवऱ्यासमवेत सहगमन (सती) केले आणि अहिल्याबाईंना दुःखाचा आणखी एक चटका मिळाला.

एकाच दिवशी घरातील तीन माणसे आणि तीही वयाने पोरसवदा

आपल्यासमक्ष निघून जाणे आणि ती सर्व आपल्या डोळ्यादेखत चितेत आणि या दुःखापेक्षा अधिक खडतर दुःख असूच शकत नव्हते. पण ही दुःखे इथेच थांबली नाहीत. कळसाचे दुःख अहिल्याबाईंची वाट पहात होते. नातवाच्या मरणाने झालेले दुःख जरा कुठे कमी होते न होते ती तिचा जावई, मुक्ताबाईचा नवरा यशवंतराव फणसे उभ्या उभ्या चार तासाच्या अवधीत कॉलऱ्याने मृत्यू पावला.

आता अहिल्याबाईंवर आकाश कोसळले. मुलगी मुक्ताबाईसुद्धा सैरभैर झाली. तिचा मुलगा आधीच गेला होता आता नवराही जग सोडून गेला त्यामुळे मायलेकींचं काळीज अक्षरशः फाटून गेलं. मुलाच्या मृत्यूमुळे मुक्ताबाई आधीच अर्धमेली झाली होती. आता नवराही गेल्यानं तिच्या संसाराची पुरती राखरांगोळी झाली. तिला जीवन नकोसं झालं. तिने नवऱ्याबरोबर सती जाण्याचा निश्चय जाहीर केला. या निर्णयाने अहिल्याबाईंचं वज्राहून कठोर अंतःकरण दुभंग झाले. आपल्या मुलीने सती जाऊ नये म्हणून प्रेमाने, रागाने अशा अनेक रीतीने अहिल्याबाईने मुक्ताबाईस समजवण्याचा प्रयत्न केला. विनवून पाहीले, पण तिचे मन वळेना. शेवटी तिने मुलीपुढे आपले मस्तक नम्र केले. साष्टांग नमस्कार घातला आणि तिला अगदी काकुळतेने विनवले की, ‘मुली जर परमेश्वराच्या ठायी तुझी खरोखर भक्ती असली तर मला तुझ्या आईला म्हातारपणी या संसारात एकटीला निराधीन करू अशी जाऊ नकोस.’

मुक्ताबाईपुढे मोठा पेच निर्माण झाला, सती जावं का आईची इच्छा मानावी? ती सुद्धा एका साध्वीची मुलगी होती. आपल्या आईच्या आचरणातील कडकपणा व कठोरपणा तिने अनेकदा पाहिला होता. अनुभवला होता. एक दोन क्षण विचारात घालविल्यावर तिने आपल्या प्रेमळ आईबद्दल वाटणारी ओढ बाजूला सारली आणि निर्धाराने आईला म्हणाली, ‘आई, आता तुझे म्हातारपण आले आहे. हे तुझे पुण्यमय आयुष्य आणखी थोड्याच दिवसात संपणार. माझे एकुलते एक बाळ

गेले, पति गेले आणि आई काही काळाने तूही मला सोडून गेलीस म्हणजे मग मी कोणाच्या तोंडाकडे पाहू? हे असले तोंड कोणास दाखवू? तू गेलीस म्हणजे माझा जीव कसा नकोसा होईल. मग माझे हे आयुष्य मला जड वाटून नकोसे होईल. तेव्हा मी काय करु? कुणाच्या तोंडाकडे पाहू? पण आज मला संधी आली आहे. ही जर मी दवडली तर मग मला पुन्हा आजच्यासारखे उजळ तोंडाने जगता येणार नाही.'

मुलीच्या या बिनतोड युक्तीवादाने अहिल्याबाई जणू मुकीच झाली. आणखी काही बोलण्यास तिच्यापाशी काही शब्दच उरले नाहीत.

यशवंतरावांची स्मशानयात्रा निघाली. शेवटचा क्षण आला, अहिल्याबाई मुक्ताबाईच्या शेजारी येऊन उभी राहिली. तिच्या दुःखाला पारावार राहिला नाही. दोघा ब्राह्मणांनी हंबरडा फोडणाऱ्या त्या प्रेमळ माताना सावरून धरले गेले. मुक्ताबाईने आपल्या दोन सवतीसह चितेवर उडी घेतली आणि इकडे अहिल्याबाईचे देहभान हरपून गेले. ती बेशुद्ध पडली. काही क्षणांनी ती सावध झाली आणि तिने प्रचंड आक्रोश सुरू केला. आपल्या अंगाला ती असे आळोखे पिळोखे देऊ लागली की चार चार दांडग्या माणसांना तिला आवरणे अशक्य झाले. शेवटी रखरखणारी चिता शांत झाली.

विधी आटोपून नदीवर स्नान करून मंडळी वाड्यात आली. या दुःखाने अहिल्याबाईंच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. पुढे कित्येकदिवस तिचे खाणेपिणे, बोलणे बंद झाले होते. तिचे मन उद्विग्न झाले ते कायमचेच. तिने तुकोजी होळकरला पत्र पाठवून त्यात लिहिले, 'ये आणि आपले राज्य सांभाळ' असे एकच पत्र नाही तर अनेक पत्रे गेली तर पुण्यास श्रीमंत पेशव्यांकडे, आम्ही महायात्रेला (काशी यात्रेला) जातो' अशा आशयाची निकडीची पत्रे रवाना केली.

परंतु सुदैवाने अहिल्याबाईंचा हा वैराग्याचा बेत सिद्धीस गेला नाही. तुकोजीने मोठी आर्जवे करू पत्रे लिहिली आणि पुण्याहूनही

पेशव्यांची समाधानाची पत्रे आली. गंगेसारख्या निर्मल अहिल्याबाई यांचे समाधान सर्वांनी केले होते. दोन चार दिवस सरल्यानंतर अहिल्याबाई कारभार करावयास सिद्ध झाली आणि तिने दरबार भरवला.

जवळच्या आप्तांचे मायापाश असे खळाखळा तुटत गेल्याने अहिल्याबाई एकाकी पडल्या. त्याचे नवल नव्हते. तिला घर खायला उठले होते. आता जवळचा आप्त तुकोजी होळकरही विकलांग झालेला होता. जवळची अशी फार कमी माणसे उरली होती.

प्रापंचिक दुःखी आणि राज्यकारभाराच्या श्रमाने अहिल्याबाईंचे शरीर झिजून गेले होते, मात्र शरीर म्हातारे झाले तरी मन धर्माचरणाच्या बाबतीत पूर्वी इतकेच उत्साहपूर्ण होते. तिच्या नित्यक्रमात कोणताही बदल झाला नव्हता. चेहऱ्यावरील दैवी तेज शेवटपर्यंत कायम होते.

मराठी वैभवाची शेवटची तेजस्वी चमक खर्ड्याच्या लढाईत दिसली (११ मार्च १७९५). निजामाविरुद्ध मराठ्यांचा विजय झाला. ही आनंदाची बातमी तिच्या कानावर आली. तिची मुद्रा प्रफुल्लित झाली. खर्ड्याचा विजय ही मालवणाऱ्या वातीची शेवटची चमक होती पण तो

दुर्भाग्याचा काळ पहायला ती राहिली नाही. लढाईनंतर पाच महिनेच ती जिवंत राहिली. तशी ती आजारी नव्हती. पण वृद्धापकाळानं आणि जवळचे कुणीच मागे राहिले नाही म्हणून ती मनाने खचत गेली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी श्रावण महिन्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई सत्तराव्या वर्षी शांतपणे मरण पावली.

अहिल्याबाईंच्या निधनाने सारी मराठेशाही हळहळली.

■

ई साहित्यवरील श्री अशोक बेंडखळे यांचे या पूर्वीचे पुस्तक

अशोक बेंडखळे



राजमाता जिजाई या शिवाजी राजांच्या माता, त्यांच्या मनात स्वराज्याचा अंकुर रूजवणाऱ्या आणि त्यांना हिंदवी राज्याची प्रेरणा देणाऱ्या. जिजाईंना बालपणी मराठी सरदार परकीयांची वेठबिगारी करतायेत हे आपल्या बंधुंकडून कळले आणि त्यांच्या मनात स्वराज्याचा विचार पक्का झाला. त्यांनी राजांवर उत्तम संस्कार केले. मर्दानी कलांमध्ये पारंगत केले. पुण्याचा कारभार पाहताना शिवबांना कारभाराची तंत्र-मंत्र शिकवली. शिवाजी राजे मोहिमांवर जात तेव्हा जिजामाता कारभाराकडे लक्ष देत. राजांचा राज्याभिषेक झाला आणि आपला पराक्रमी पुत्र लोकांचा राजा झाला हे पाहून त्या कृतार्थ झाल्या. एक माता मनात आणले तर काय करू शकते त्याचे जिजामाता हे ज्वलंत उदाहरण आहे.